भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६

**(सन १९५६ चा अधिनियम क्रमांक १०४)**

(१९ मार्च, २००४ रोजी यथाविद्यमान)

# The Immoral Traffic (Prevention) Act, 1956

## (Act No. 104 of 1956)

*(As in force on the 19th March 2004)*

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन मुंबई ४०० ००४ यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००७

[ **किंमत :** रुपये १७.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १९ मार्च २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि इम्मॉरल ट्रॅफिक (प्रिव्हेन्शन) ॲक्ट, १९५६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर २००४ यात पृष्ठ १९० ते २०७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक : १४ ऑक्टोबर, २००४.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 as on the 14th March, 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary Part XII, Section 1, No. 2 Vol. 13, dated 14th October 2004 on pages 190 to 207.

This authoritative text was published under the authority of the President Under Section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Date 14th October 2004.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६

## कलमांचा क्रम


कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ

२. व्याख्या.

२क. जम्मू व काश्मीर राज्याला लागू नसलेल्या अधिनियमितींचा अर्थ लावण्यासंबंधीचा नियम.

३. कुंटणखाना चालविण्याबद्दल किंवा जागेचा वापर कुंटणखान्याप्रमाणे करण्यास परवानगी दिल्याबद्दल शिक्षा.

४. वेश्याव्यवसायाच्या कमाईवर उपजीविका केल्याबद्दल शिक्षा.

५. व्यक्तीला वेश्याव्यवसाय करण्यासाठी प्राप्त करणे/मिळवणे, प्रवृत्त करणे किंवा घेणे.

६. जेथे वेश्याव्यवसाय चालतो त्या जागेत व्यक्तीला अडकवून ठेवणे.

७. सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या जवळपास चालणारा वेश्याव्यवसाय.

८. वेश्याव्यवसायाच्या प्रयोजनार्थ फितवणे किंवा मोह घालणे.

९. अभिरक्षेतील व्यक्तीला फितवणे.

१०. [ निरसित ].

१०क. सुधार संस्थेमधील स्थानबद्धता.

११. पूर्वी दोषसिद्धी झालेल्या अपराध्यांच्या पत्त्यासंबंधीची अधिसूचना.

१२. [ निरसित ].

१३. विशेष पोलीस अधिकारी आणि सल्लागार संस्था.

१४. दखलपात्र अपराध.

१५. वॉरंटशिवाय झडती घेणे.

१६. व्यक्तीची सुटका.

१७. कलम १५ अन्वये काढून टाकलेल्या किंवा कलम १६ अन्वये सुटका केलेल्या व्यक्तींची दरम्यानची अभिरक्षा.

१७क. कलम १६ अन्वये सुटका करण्यात आलेल्या व्यक्तींना त्यांचे मातापिता किंवा पालक यांच्याकडे सुपुर्द करण्यापूर्वी पाळावयाच्या शर्ती.

१८. कुंटणखाणा बंद करणे आणि अपराध्यांना त्या जागेतून बाहेर काढणे.

१९. सुरक्षागृहात ठेवण्यात यावे यासाठी किंवा न्यायालयाकडून देखरेख व संरक्षण व्हावे यासाठी अर्ज.

२०. कोणत्याही जागेतून वेश्येला काढून टाकणे.

२१. सुरक्षागृहे.

२१क. अभिलेख सादर करणे.

२२. संपरीक्षा.

२२क. विशेष न्यायालये स्थापन करण्याचा अधिकार.

२२क. केंद्र सरकारचा विशेष न्यायालये स्थापन करण्याचा अधिकार.

२२ख. प्रकरणांची संक्षिप्तरीत्या संपरीक्षा करण्याचा न्यायालयाचा अधिकार.

२३. नियम करण्याचा अधिकार.

२४. हा अधिनियम इतर विवक्षित अधिनियमांना न्यूनकारी नसणे.

२५. निरसन व व्यावृत्ती.

**अनुसूची.**

# अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६

(१९५६ चा अधिनियम क्रमांक १०४)[१]

(१९ मार्च २००४ रोजी यथाविद्यमान)

[ ३० डिसेंबर १९५६] .

**न्युयॉर्क येथे ९ मे, १९५० रोजी झालेल्या आंतरराष्ट्रीय करारानुसार [२][अनैतिक व्यापारास प्रतिबंध ] करण्याकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी, संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, "[३][अनैतिक व्यापार (प्रतिबंध) ] अधिनियम, १९५६ ", म्हणावे.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल.

(३) हे कलम ताबडतोब अंमलात येईल, आणि या अधिनियमाच्या उर्वरित तरतुदी केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास [४] अंमलात येतील.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, —

(क) " कुंटणखाना " यांत, जे [५][लैंगिक शोषण किंवा लैंगिक दुराचार] करण्यासाठी अन्य व्यक्तीच्या लाभासाठी किंवा दोन किंवा अधिक वेश्यांच्या परस्पर लाभासाठी वापरले असेल असे कोणतेही घर, खोली, [६][वाहन] किंवा जागा किंवा यांचा कोणताही भाग, यांचा समावेश असेल ;

[७][(कक) " बालक " याचा अर्थ, ज्याने वयाची १६ वर्षे पूर्ण केलेली नाहीत, अशी व्यक्ती, असा आहे ;]

[६][ [८][(ख)] " सुधार संस्था " याचा अर्थ, ज्यात, ज्यांना सुधारण्याची गरज आहे, अशा [९][व्यक्तींना] या अधिनियमाअन्वये स्थानबध्द करता येईल, अशी (कलम २१ अन्वये सुधार संस्था म्हणून स्थापन झालेली किंवा तसे लायसन मिळालेली संस्था ) कोणत्याही नावाने संबोधली जाणारी संस्था, असा असून त्यामध्ये, या अधिनियमानुसार [१०][न्यायचौकशी चालू असलेल्या व्यक्तींना ] जिथे ठेवता येऊ शकेल अशा आश्रयस्थानांचा अंतर्भाव आहे ;]

[११] * * * * *

---

[१] या अधिनियमाचा विस्तार, १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूची एक द्वारे दादरा व नगर हवेलीवर (१ जुलै १९६५ रोजी व तेंव्हापासून), १९६३ चा विनियम ११, कलम ३ व अनुसूचीद्वारे गोवा, दमण व दीववर आणि १९६८ चा अधिनियम २६, कलम ३ व अनुसूचीद्वारे पाँडिचेरी संघ राज्यक्षेत्रावर केला.

[२] १९८६ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (२६ जानेवारी १९८७ रोजी व तेंव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (२६ जानेवारी १९८७ रोजी व तेंव्हापासून).

[४] १ मे १९५८, पहा-जी.एस.आर. २६९, दिनांक १६ एप्रिल १९५८ ; भारताचे **राजपत्र,** भाग दोन, विभाग ३ (एक), पृठ २०३.

[५] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी १९८७ रोजी व तेंव्हापासून).

[६] १९७८ चा अधिनियम ४६, कलम २ द्वारे समाविष्ट केले (२ ऑक्टोबर १९७९ रोजी व तेंव्हापासून).

[७] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ५ द्वारे समाविष्ट केले (२६ जानेवारी १९८७ रोजी व तेंव्हापासून).

[८] वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे खंड (कक) याला खंड ख असा नवीन क्रमांक दिला (२६ जानेवारी १९८७ रोजी व तेंव्हापासून).

[९] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी १९८७ रोजी व तेंव्हापासून).

[१०] वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी १९८७ रोजी व तेंव्हापासून).

[११] वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे खंड (ख) वगळण्यात आला (२६ जानेवारी १९८७ रोजी व तेंव्हापासून).

¹[ (ग) " दंडाधिकारी " याचा अर्थ, अनुसूचीच्या दुसऱ्या स्तंभामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व ज्या कलमात हा शब्दप्रयोग येईल त्या कलमाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यास सक्षम असलेला दंडाधिकारी, असा आहे. ते कलम, अनुसूचीच्या पहिल्या स्तंभामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले आहे.]

²[ (गक) " सज्ञान " याचा अर्थ, ज्या व्यक्तीने वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली असतील अशी व्यक्ती, असा आहे ;

(गख) " अज्ञान " याचा अर्थ, जिने वयाची सोळा वर्षे पूर्ण केली आहेत परंतु वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली नाहीत, अशी व्यक्ती, असा आहे ;]

(घ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

³ [* * * * * *]

⁴[⁵ [ (च) " वेश्याव्यवसाय " याचा अर्थ, वाणिज्यिक प्रयोजनांकरिता केलेले, व्यक्तींचे लैंगिक शोषण किंवा केलेला लैंगिक दुराचार आणि " वेश्या " या शब्दप्रयोगाचा अन्वयार्थ तद्नुसार लावण्यात येईल ;] ]

(छ) " सुरक्षागृह " याचा अर्थ, ज्यांची काळजी घेण्याची व ज्यांना संरक्षण देण्याची गरज आहे अशा ⁶[व्यक्तींना] या अधिनियमान्वये जेथे ठेवण्यात येते ⁷[आणि जेथे समुचित तांत्रिक अर्हता असलेल्या व्यक्ती, साधनसामग्री व इतर सुविधांची तरतूद करण्यात आलेली असते] अशी (कलम २१ अन्वये सुरक्षागृह म्हणून स्थापना झालेली किंवा अनुज्ञप्ती मिळालेली संस्था) कोणत्याही नावाने संबोधली जाणारी संस्था, असा आहे. परंतु, ज्यात,—

(एक) संरक्षण, जेथे या अधिनियमाला अनुसरून, ज्यांची ⁸[न्यायचौकशी चालू आहे अशा व्यक्तींना] ठेवता येईल ; किंवा

(दोन) सुधार संस्था,

याचा समावेश होत नाही.

(ज) " सार्वजनिक ठिकाण " याचा अर्थ, कोणतीही सार्वजनिक वापरासाठी किंवा आम जनतेला प्रवेश असणारी जागा, असा आहे आणि यात कोणत्याही सार्वजनिक वाहनांचा समावेश होतो ;

(झ) " विशेष पोलीस अधिकारी " याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, विनिर्दिष्ट क्षेत्रातील पोलीस कर्तव्यांचा प्रभारी म्हणून राज्य शासनाने किंवा राज्य शासनाच्या वतीने नियुक्त केलेला पोलीस अधिकारी, असा आहे ;

⁹[(ञ) " अपव्यापार पोलीस अधिकारी " याचा अर्थ, कलम १३ च्या पोट कलम (४) अन्वये केंद्र सरकारने नियुक्त केलेला पोलीस अधिकारी, असा आहे.]

**जम्मू व काश्मीर राज्याला लागू नसलेल्या अधिनियमितीचा अर्थ लावण्यासंबंधीचा नियम.**

¹⁰[२क. जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात नसलेल्या कायद्यांसंबंधीचा या अधिनियमामधील कोणत्याही संदर्भाचा अन्वयार्थ, त्या राज्याच्या संबंधात त्या राज्यात अंमलात असलेल्या, तत्सम कायद्याचा, कोणताही असल्यास, संदर्भ आहे, असा लावण्यात येईल.]

---

¹ १९७८ चा अधिनियम ४६, कलम २ द्वारे खंड (ग) ऐवजी दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

² १९८६ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

³ १९७८ चा अधिनियम ४६, कलम २ द्वारे खंड (ङ) वगळला (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

⁴ १९७८ चा अधिनियम ४६, कलम २ द्वारे खंड (च) आणि खंड (छ) ऐवजी दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

⁵ १९८६ चा अधिनियम ४४, कलम ५ द्वारे खंड (च) ऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

⁶ वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केला (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

⁷ वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे समाविष्ट केला (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

⁸ वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

⁹ वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे (खंड) (ञ) ऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

¹⁰ १९७८ चा अधिनियम कलम ४६, कलम द्वारे समाविष्ट केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

**कुंटणखाना चालविण्याबद्दल किंवा जागेचा वापर कुंटणखान्याप्रमाणे करण्यास परवानगी दिल्याबद्दल शिक्षा.**

**३.** (१) कोणतीही व्यक्ती, जी कुंटणखाना चालवते किंवा त्याची व्यवस्था पाहते, किंवा चालविण्याची किंवा व्यवस्था पाहण्याची कृती करते किंवा कुंटणखाना चालविण्यासाठी किंवा व्यवस्था पाहण्यासाठी सहाय्य करते, तिच्या पहिल्या अपराधसिद्धीसाठी, एका वर्षापेक्षा कमी नसेल आणि तीन वर्षापेक्षा अधिक नसेल एवढ्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या आणि दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या आणि तसेच दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधसिद्धीसाठी दोन वर्षांपेक्षा कमी नसेल आणि पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल एवढ्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या आणि दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(२) (क) कोणत्याही जागेचा भाडेकरू, पट्टेदार, वहिवाटदार, किंवा प्रभारी असणारी जी कोणतीही व्यक्ती, अशा जागेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा कुंटणखान्यासाठी वापर करील किंवा कोणत्याही इतर व्यक्तीला, अशी जागा किंवा तिचा कोणताही कुंटणखाना म्हणून वापरण्यास बुद्धिपुरस्सर परवानगी देईल ; किंवा

(ख) कोणत्याही जागेचा मालक, पट्टाकार किंवा जमीन मालक असलेली किंवा अशा मालकाचा, पट्टाकाराचा किंवा जमीन मालकाचा एजंट असलेली व्यक्ती, अशा जागेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा कुंटणखाना म्हणून वापर करण्यात येणार आहे हे माहीत असूनही ती जागा किंवा तिचा कोणताही भाग भाड्याने देईल किंवा अशा जागेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा कुंटणखान्याप्रमाणे वापर करण्याच्या कामी स्वेच्छेने, जाणीवपूर्वक भागीदार होईल.

अशी कोणतीही व्यक्ती, पहिल्या अपराधसिद्धीनंतर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढया द्रव्यदंडाच्या शिक्षेस आणि दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधसिद्धीनंतर, पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या तसेच द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

[१][ (२क) पोटकलम (२) च्या प्रयोजनार्थ, त्या पोटकलमाच्या, खंड (क) किंवा खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही व्यक्ती, पुढील कारणांवरून, जागेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा कुंटणखान्याप्रमाणे वापर करण्यास बुद्धिपुरस्सर परवानगी देत असल्याचे किंवा, यथास्थिति, जागेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा कुंटणखान्याप्रमाणे वापर होत असल्याचे तिला ज्ञात असल्याचे, जर,—

(क) या अधिनियमान्वये, त्या जागेची झडती घेतली असता, त्या जागेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा कुंटणखान्यासाठी वापर होत असल्याचे आढळून आल्याचे प्रतिवृत्त तेथे खप असलेल्या वृतपत्रात प्रकाशित झाल्यास ; किंवा

(ख) अशा व्यक्तीला, खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या झडतीत, सापडलेल्या सर्व गोष्टींची यादी दिली गेली असेल तर,

तद्विरुद्ध सिद्ध होईपर्यंत असे मानण्यात येईल.]

(३) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (२) च्या खंड (क) किंवा खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, कोणतीही जागा किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत, त्या पोटकलमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल अपराधसिद्ध ठरविण्यात आल्यावर, असा अपराध घडण्याच्या वेळेस, ज्या कोणत्याही भाडेपट्ट्यान्वये किंवा कराराअन्वये अशी जागा भाडेपट्ट्याने देण्यात आली असेल किंवा धारण करण्यात आली असेल किंवा तिचा भोगवटा करण्यात येत असेल, असा भाडेपट्टा किंवा करार, असा अपराध सिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, शून्य व अप्रवर्ती ठरेल.

**वेश्याव्यवसायाच्या कमाईवर उपजीविका केल्याबद्दल शिक्षा.**

**४.** (१) कोणतीही अठरा वर्षांवरील व्यक्ती, जी बुद्धिपुरस्सर, [२][कोणत्याही इतर व्यक्तीच्या ] वेश्याव्यवसायाच्या मिळकतीवर संपूर्णत: उपजीविका करीत असेल ती, ज्याचा कालावधी दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल. [३][आणि जेव्हा अशी कमाई बालकाच्या किंवा अज्ञान व्यक्तीच्या वेश्याव्यवसायाशी संबंधित असेल, तेव्हा ती, सात वर्षांपेक्षा कमी नसेल आणि दहा वर्षांपेक्षा अधिक नसेल, एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल.]

[४][(२) जेव्हा अठरा वर्षांवरील कोणतीही व्यक्ती,—

(क) वेश्येबरोबर राहात असल्याचे किंवा वेश्येच्या नित्य संगतीत असल्याचे ; किंवा

(ख) ज्यावरून अशी व्यक्ती, एखाद्या वेश्येला, वेश्याव्यवसायाला मदत करीत असल्याचे, अपप्रेरणा देत असल्याचे किंवा जबरदस्ती करीत असल्याचे दिसून येत असेल, अशाप्रकारे, त्या वेश्येच्या हालचालीवर नियंत्रण ठेवल्याचे, निदेशन केल्याचे किंवा प्रभाव टाकल्याचे ; किंवा

---

[१] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ६ द्वारे समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[४] १९७८ चा अधिनियम ४६, कलम ४ द्वारे पोटकलम २ ऐवजी दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

(ग) एखाद्या वेश्येच्या वतीने दलाल किंवा मध्यस्थ म्हणून काम करीत असल्याचे ;
सिद्ध झाल्यास,

तद्‌विरुद्ध असे सिद्ध होईपर्यंत, अशी व्यक्ती, पोटकलम (१) च्या अर्थांतर्गत, बुद्धिपुरस्सर, दुसऱ्या व्यक्तीच्या वेश्याव्यवसायाच्या कमाईवर उपजीविका करीत असल्याचे गृहित धरण्यात येईल.]

[१][व्यक्तीला] वेश्याव्यवसाय करण्यासाठी प्राप्त करणे/मिळविणे, प्रवृत्त करणे किंवा घेणे.

५. (१) जी कोणतीही व्यक्ती,—

(क) वेश्याव्यवसाय करण्याच्या प्रयोजनासाठी एखाद्या [१][व्यक्तीला], तिच्या संमतीने किंवा संमतीशिवाय प्राप्त करील किंवा प्राप्त करण्याचा प्रयत्न करील ; किंवा

(ख) एखाद्या [१][व्यक्तीला], तिने वेश्याव्यवसायाच्या प्रयोजनासाठी एखाद्या कुंटणखान्यामध्ये रहावे किंवा वारंवार तेथे जावे या हेतूने तिला प्रवृत्त करील ;

(ग) एखाद्या [१][व्यक्तीला], तिने वेश्याव्यवसाय चालविण्यासाठी एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाईल किंवा घेऊन जाण्याचा प्रयत्न करील किंवा वेश्याव्यवसाय चालविण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी आणेल किंवा आणण्याचा प्रयत्न करील ; किंवा

(घ) एखाद्या [१][व्यक्तीला], वेश्याव्यवसाय करावयास लावील किंवा त्यासाठी प्रवृत्त करील ;

[२][ती, अपराधसिद्ध झाल्यावर, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल आणि सात वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या सश्रम करावासाच्या आणि दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि या पोटकलमाखालील कोणताही अपराध, कोणत्याही व्यक्तीच्या इच्छेविरुद्ध केला असल्यास, सात वर्षांच्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा चौदा वर्षांपर्यंत होऊ शकेल :

परंतु, जिच्याबाबतीत या पोटकलमाअन्वये अपराध घडला असेल ती व्यक्ती,—

(एक) बालक असल्यास, या पोटकलमाखाली तरतूद केलेली शिक्षा, सात वर्षांपेक्षा कमी नसणाऱ्या परंतु, आजीव असू शकणाऱ्या सश्रम कारावासापर्यंत असू शकेल ; आणि

(दोन) अज्ञान असल्यास, या पोटकलमाखाली तरतूद केलेली शिक्षा, सात वर्षांपेक्षा कमी नसेल आणि चौदा वर्षांपेक्षा अधिक नसेल एवढ्या मुदतीच्या सश्रम कारावासाची असेल ;]

[३][ * * * * * *]

(३) या कलमाखालील एखाद्या अपराधाची न्यायचौकशी पुढील ठिकाणी करण्यात येईल,—

(क) जेथून [१][व्यक्तीला] प्राप्त करण्यात आले असेल, (वेश्यागृहात) जाण्यासाठी प्रवृत्त करण्यात आले असेल, किंवा घेऊन जाण्यात आले असेल किंवा घेऊन जाण्याची व्यवस्था करण्यात आली असेल किंवा जेथून अशा [१][व्यक्तीला] प्राप्त करण्याचा किंवा घेऊन जाण्याचा प्रयत्न करण्यात आला असेल त्या जागेत ; किंवा

(ख) ज्या जागी जाण्यासाठी तिला प्रवृत्त करण्यात आल्यामुळे, ती जेथे गेली असेल किंवा जेथे तिला घेऊन जाण्यात आले असेल किंवा घेऊन जाण्याची व्यवस्था करण्यात आली असेल किंवा जेथे तिला घेऊन जाण्याचा प्रयत्न करण्यात आला असेल, अशा जागेत.

जेथे वेश्याव्यवसाय चालतो त्या जागेत, व्यक्तीला अडवून ठेवणे.

६. (१) जी कोणतीही व्यक्ती, [४][कोणत्याही इतर व्यक्तीस तिच्या संमतीने असो किंवा नसो],—

(क) कोणत्याही कुंटणखान्यामध्ये, किंवा

(ख) [४][अशा व्यक्तीने, तिचा पती, पत्नी नसेल अशा व्यक्तीबरोबर संभोग करावा या उद्देशाने,] कोणत्याही जागेमध्ये किंवा जागेवर अडकवून ठेवील,

[४][ती, अपराध सिद्ध झाल्यावर सात वर्षांपेक्षा कमी नसणाऱ्या पण आजीव असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा दहा वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची, यांपैकी कोणत्याही एका प्रकारच्या कारावासाच्या शिक्षेस तसेच द्रव्यदंडासही पात्र होईल :

परंतु, न्यायालय, न्यायनिर्णयात नमूद करावयाच्या, पर्याप्त आणि विशेष कारणांकरिता सात वर्षांपेक्षा कमी नसेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा ठोठावू शकेल.]

---

[१] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).
[२] वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).
[३] वरील अधिनियमाच्या ४४, कलम ८ द्वारे वगळण्यात आले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).
[४] वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[1][(२) एखादी व्यक्ती, कुंटणखान्यात एखाद्या बालकासह आढळल्यास, तिने पोटकलम (१) खालील, अपराध केला असल्याचे तद्‌विरुद्ध सिद्ध झाल्याखेरीज, गृहीत धरले जाईल.

(२क) कुंटणखान्यात सापडलेल्या एखाद्या बालकाच्या किंवा अज्ञान व्यक्तीच्या वैद्यकीय तपासणी वरून तिचा लैंगिक दुरूपयोग झाल्याचे निष्पन्न झाले तर, त्या बालकाला किंवा अज्ञान व्यक्तीला वेश्याव्यवसायाच्या प्रयोजनार्थ, अडकवून ठेवण्यात आले असल्याचे, किंवा, यथास्थिति, वाणिज्यिक प्रयोजनासाठी तिचे लैंगिक शोषण करण्यात आल्याचे, तद्‌विरुद्ध सिद्ध झाल्याखेरीज, गृहीत धरले जाईल.]

(३) एखादी व्यक्ती, एखाद्या स्त्रीने किंवा मुलीने कायदेशीर पती नसणाऱ्या माणसाबरोबर संभोग करावा या प्रयोजनासाठी, तिने कुंटणखान्यात राहावे अशी तिच्यावर सक्ती करण्याच्या किंवा त्यासाठी तिला प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने,—

(क) तिच्या मालकीचे कोणतेही दागिने, वस्त्रप्रावरणे, पैसे किंवा अन्य मालमत्ता अडवून धरील ; किंवा

(ख) अशा व्यक्तीने किंवा अशा व्यक्तीच्या निदेशावरून त्या स्त्रिला किंवा त्या मुलीला उसने देण्यात आलेले किंवा पुरविण्यात आलेले कोणतेही दागिने, वस्त्रप्रावरणे, पैसे किंवा इतर मालमत्ता ती स्त्री किंवा मुलगी स्वतःबरोबर घेऊन जाईल तर, तिच्यावर न्यायालयीन कार्यवाही करण्याची धमकी देत असेल,

तर, अशा व्यक्तीने त्या स्त्रिला किंवा मुलीला कुंटणखान्यात किंवा कोणत्याही जागेत किंवा जागेवर अडकवून ठेवले असल्याचे गृहीत धरले जाईल.

(४) तद्‌विरुद्ध कोणताही कायदा असला तरी, ज्या व्यक्तीने अशा स्त्रिला किंवा मुलीला अडकवून ठेवलेले असेल त्या व्यक्तीच्या सांगण्यावरून, अशा स्त्रिला किंवा मुलीला किंवा अशा स्त्रिसाठी किंवा मुलीसाठी उसने देण्यात आल्याचे किंवा पुरविण्यात आल्याचे किंवा अशा स्त्रीने किंवा मुलीने तारण म्हणून ठेवले असल्याचे अभिकथित असलेले कोणतेही दागदागिने, वस्त्रप्रावरणे किंवा अन्य मालमत्ता यांच्या वसुलीसाठी किंवा अशी स्त्री किंवा मुलगी यांच्याकडून देय असल्याचे अभिकथित असलेल्या कोणत्याही पैशाच्या वसुलीसाठी अशी स्त्री किंवा मुलगी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

**सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या जवळपास चालणारा वेश्याव्यवसाय.**

७. [2][(१) (क) पोटकलम (३) खाली अधिसूचित केलेल्या क्षेत्रांमध्ये किंवा क्षेत्रांमध्ये येणाऱ्या, किंवा

(ख) कोणत्याही सार्वजनिक धार्मिक पूजास्थानापासून, वसतिगृहापासून, रुग्णालयांपासून, शुश्रूषालयापासून किंवा पोलीस आयुक्ताने किंवा दंडाधिकाऱ्याने यासंबंधात विहित रीतीने अधिसूचित केलेल्या कोणत्याही प्रकारच्या अशा अन्य सार्वजनिक ठिकाणांपासून दोनशे मीटर अंतराच्या आत येणाऱ्या,

कोणत्याही जागेत वेश्याव्यवसाय करीत असेल अशी कोणतीही [3][व्यक्ती] आणि असा वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या व्यक्तीबरोबर असेल ती व्यक्ती, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल.

[4][१क] पोटकलम (१) खालील अपराध हा एखाद्या बालकाच्या किंवा अज्ञान व्यक्तीच्या बाबतीत केलेला अपराध त्याबाबतीत, असा अपराध करणारी व्यक्ती, एकतर, सात वर्षांपेक्षा कमी नसेल पण आजीव असू शकेल एवढ्या मुदतीच्या किंवा दहा वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या यांपैकी कोणत्याही एका प्रकारच्या कारावासाच्या शिक्षेस तसेच द्रव्यदंडास देखील पात्र होईल :

परंतु, न्यायालय, न्यायनिर्णयात विनिर्दिष्ट करावयाच्या पर्याप्त व विशेष कारणांकरिता सात वर्षांपेक्षा कमी असणार नाही इतकी कारावासाची शिक्षा ठोठावू शकेल.]

(२) (क) कोणत्याही सार्वजनिक ठिकाणाची रक्षक असणारी जी कोणतीही व्यक्ती, वेश्यांना त्यांच्या व्यवसायाच्या प्रयोजनार्थ, अशा जागेचा आश्रय घेण्याची किंवा त्यासाठी अशा जागेत राहण्याची जाणूनबुजून परवानगी देईल ; किंवा

(ख) पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही जागेचा भाडेकरू, पट्टेदार, भोगवटादार किंवा प्रभारी असणारी कोणतीही व्यक्ती, ती जागा किंवा तिचा कोणताही भाग, वेश्याव्यवसायासाठी वापरला जाण्यासाठी जाणूनबुजून परवानगी देईल ; किंवा

---

[1] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ९ द्वारे पोटकलम (२) ऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[2] १९७८ चा अधिनियम ४६, कलम ५ द्वारे, पोटकलम (१) ऐवजी दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[3] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[4] वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(ग) पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही जागेचा मालक, पट्टाकार किंवा जमीनमालक किंवा अशा मालकाचा, पट्टाकाराचा, जमीनमालकाचा अभिकर्ता असणारी जी कोणतीही व्यक्ती, ती जागा किंवा तिचा कोणताही भाग, यांचा वेश्याव्यवसायासाठी उपयोग केला जाऊ शकेल हे माहित असताना, ती जागा किंवा तिचा कोणताही भाग भाड्याने देईल किंवा अशा वापरामध्ये ज्याचा स्वेच्छेने सहभाग असेल,

अशी व्यक्ती, तिच्या पहिल्या अपराधसिद्धिसाठी, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल आणि दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधसिद्धिबद्दल सहा महिन्यापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि तसेच, [१][दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडासह शिक्षापात्र असेल आणि जर ते सार्वजनिक ठिकाण किंवा जागा हे, हॉटेल असेल त्या त्या काळात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली अशा हॉटेलला व्यवसाय करण्यासाठी तीन महिन्यांपेक्षा कमी नसलेल्या पण एका वर्षापर्यंत असू शकणाऱ्या कालावधीसाठी निलंबित होईल :

परंतु, या पोटकलमाखालील अपराध, हॉटेलातील बालकाच्या, किंवा अज्ञान व्यक्तीच्या बाबतीत घडला असेल तर, असे लायसन रद्द होण्यास सुद्धा पात्र असेल.

**स्पष्टीकरण.—** या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, " हॉटेल " याचा अर्थ, हॉटेल प्राप्ती कर अधिनियम, १९८० (१९८० चा ५४) याच्या कलम २, खंड (६) मध्ये असल्याप्रमाणे असेल.]

[२][(३) राज्य शासन, राज्यातील कोणत्याही क्षेत्रात किंवा क्षेत्रामध्ये निरनिराळ्या व्यक्तींची वारंवार होणारी ये-जा, तेथील लोकांची स्वाभाविकता व अधिक लोकसंख्या आणि तत्संबंधातील इतर बाबी विचारात घेऊन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये वेश्याव्यवसाय चालविता येणार नाही.

(४) पोटकलम (३) अन्वये, कोणत्याही एका किंवा अनेक क्षेत्रांच्या संबंधात अधिसूचना काढण्यात आली असेल तेव्हा, राज्य शासन, वाजवी निश्चिततेने अधिसूचनेतील अशा एका किंवा अनेक क्षेत्रांच्या सीमा निश्चित करील.

(५) अशी अधिसूचना, ती जेव्हा काढण्यात आली त्या दिनांकानंतरचा नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वीच्या दिनांकापासून ती, अंमलात येईल अशा रीतीने काढण्यात येणार नाही.]

**वेश्याव्यवसायाच्या प्रयोजनार्थ फितवणे किंवा मोह घालणे.**

८. जो कोणी, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणापासून दृष्टीच्या टप्प्यातील ठिकाणी आणि त्या सार्वजनिक ठिकाणापासून पाहता येईल किंवा ऐकता येईल अशा रीतीने, कोणतीही इमारत किंवा घर याच्या आतून असो किंवा नसो,—

(क) वेश्याव्यवसाय करणाऱ्या प्रयोजनार्थ, कोणत्याही व्यक्तीला शब्दांद्वारे, अंगविक्षेपांनी किंवा बुद्धिपुरस्सर स्वतःचे प्रदर्शन करून (मग ते इमारतीच्या किंवा घराच्या खिडकीत किंवा सज्जात बसून केलेले असो किंवा अन्य कोणत्याही प्रकारे केलेले असो) किंवा अन्य मार्गाने मोहात पाडील किंवा मोहात पाडण्याचा प्रयत्न करील किंवा त्या व्यक्तीचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करील ; किंवा

(ख) वेश्याव्यवसायाच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही व्यक्तीची अभियाचना करील किंवा छेड काढील किंवा जवळपास राहणाऱ्या किंवा अशा सार्वजनिक ठिकाणांहून जाणाऱ्या व्यक्तींना अडथळा निर्माण होईल किवा त्रास होईल अशा रीतीने सार्वजनिक शिष्टाचाराचा भंग होईल, अशा रीतीने भटकत राहील किंवा कृती करील.

त्याची पहिली अपराधसिद्धी झाल्यावर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावास किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस आणि त्याच्या दुसऱ्या किंवा उत्तरवर्ती अपराधसिद्धिनंतर एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासास आणि पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडासही शिक्षापात्र असेल :

[३][परंतु, या कलमाखाली जेव्हा एखाद्या पुरुषाने अपराध केला असेल तेव्हा तो, सात दिवसांपेक्षा कमी नसेल परंतु तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल.]

---

[१] १९८६ चा अधिनियम ४४, कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[२] १९७८ चा अधिनियम ४६, कलम ५ द्वारे, समाविष्ट केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[३] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ११ द्वारे, जादा दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

**अभिरक्षेतील व्यक्तीला फितवणे.**

९. [१][***]एखाद्या [२][व्यक्ती] ची [३][अभिरक्षा, प्रभार किंवा देखरेख जिच्याकडे आहे किंवा त्या [२][व्यक्ती] वर जिचा अधिकार आहे ] अशा कोणत्याही व्यक्तीने, त्या [२][व्यक्ती] ला वेश्या व्यवसाय करण्यासाठी फितवले किंवा फितवण्यास मदत केली किंवा फितविण्यास अपप्रेरणा दिली तर, [४][ती अपराधसिद्धीनंतर, सात वर्षांपेक्षा कमी नसेल पण आजीव असू शकेल इतक्या कालावधीच्या दोन्ही प्रकारच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा जी दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही पात्र होईल :

परंतु, न्यायालय, न्यायनिर्णयात निर्देशित करण्यात येईल अशा समुचित आणि विशेष कारणांसाठी सात वर्षांपेक्षा कमी कालावधीच्या कारावासाची शिक्षा लादू शकेल.]

[५][***]

[६][१०. **[सदाचरणामुळे किंवा उचित समज देऊन परिवीक्षेवर मुक्तता]**. स्त्रिया व मुली अपव्यापार दमन (विशोधन) अधिनियम, १९८६ (१९८६ चा ४४), कलम १३ द्वारे निरसित (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून.]

**[सुधार संस्थेमधील स्थानबद्धता.**

**१०क.** (१) जेव्हा,—

(क) एखादी स्त्री कलम ७ किंवा कलम ८ [७][***] खाली अपराधी असल्याचे आढळून येईल ; आणि

(ख) अपराध्याचे चारित्र्य, स्वास्थ्य व मानसिक अवस्था आणि प्रकरणाची इतर परिस्थिती अशी असेल की, तिच्या वागण्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक इतक्या कालावधीसाठी आणि तसे शिक्षण देण्यासाठी व शिस्त लावण्यासाठी तिला स्थानबद्धतेत ठेवणे इष्ट असेल,

तेव्हा, न्यायालयाने कारावासाच्या शिक्षेऐवजी, न्यायालयास योग्य वाटेल त्याप्रमाणे दोन वर्षांपेक्षा कमी नसणाऱ्या आणि पाच वर्षांहून अधिक नसणाऱ्या अशा कालावधीसाठी सुधार संस्थेमध्ये स्थानबद्ध करण्याचा आदेश देणे कायदेशीर असेल :

परंतु, असे आदेश देण्यापूर्वी,—

(एक) न्यायालय, अपराध्याला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देईल आणि अशा संस्थेमध्ये उपचारासाठी पाठविण्याबाबत त्यांचे प्रकरण योग्य असल्याविषयी त्या अपराध्याने न्यायालयाला केलेले अभिवेदन आणि अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ (१९५८ चा २०) अन्वये नियुक्त केलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्याचा अहवाल विचारात घेईल ; आणि

(दोन) न्यायालय, असे नमूद करील की, त्यांची अशी खात्री झालेली आहे की, अपराध्याचे चारित्र्य, स्वास्थ्य आणि मानसिक अवस्था आणि या प्रकरणाची अन्य परिस्थिती अशाप्रकारची आहे की, पूर्वोक्त असे शिक्षण व शिस्त यामुळे त्या अपराध्याला हितावह ठरणार आहे.

(२) पोटकलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, अपील, निर्देश आणि पुनर्विलोकनाशी संबंधित फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या तरतुदी आणि ज्या मुदतीत अपील दाखल करण्यात येईल त्याविषयीचे मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६) याच्या तरतुदी ह्या पोटकलम (१) खालील स्थानबद्धतेच्या आदेशाला जणू काही तो आदेश ज्या कालावधीसाठी स्थानबद्धतेचा आदेश दिलेला असेल तेवढ्याच कालावधीच्या कारावासाची शिक्षा असल्याप्रमाणे त्यास लागू असेल.

(३) या बाबतीत केलेल्या अशा नियमांच्या अधीनतेने, राज्य शासन किंवा या बाबतीत प्राधिकृत केलेले प्राधिकरण, सुधारगृहात स्थानबद्ध करण्याच्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या समाप्तीनंतर, कोणत्याही वेळी, जर त्याची अशी खात्री झाली की, अपराधी उपयुक्त आणि उद्यमशील जीवन व्यतीत करील, तर त्या अपराधी स्त्रीस विनाशर्त किंवा त्यास योग्य वाटतील अशा शर्तींसह अशा संस्थेतून मुक्त करू शकेल आणि विहित केलेल्या अशा नमुन्यात तिला लेखी लायसन देऊ शकेल.

---

[१] १९८६ चा अधिनियम ४४, कलम १२ द्वारे वगळण्यात आले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियम कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[३] १९८७ चा अधिनियम ४, कलम ६ दाखल केले (१२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[४] १९८६ चा अधिनियम ४४, कलम १२ द्वारे व दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[५] वरील अधिनियमाच्या कलम १२, द्वारे पोट-कलम (२) वगळण्यात आले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[६] १९७८ चा अधिनियम ४६, कलम ७ द्वारे, कलम १० ऐवजी दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[७] १९८६ चा अधिनियम ४४, कलम १४ द्वारे वगळण्यात आले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(४) पोटकलम (३) अन्वये ज्या शर्तींवर अपराध्याची मुक्तता होईल त्यात, अपराध्याच्या निवासाबाबतच्या आणि अपराध्याची कृत्ये व हालचाली यावर देखरेख ठेवण्याबाबतच्या आवश्यकता यांचा अंतर्भाव असेल.

**पूर्वी दोषसिद्धी झालेल्या अपराध्यांच्या पत्त्यासंबंधीची अधिसूचना.**

**११.** (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीची, —

(क) भारतातील न्यायालयाकडून, या अधिनियमाखाली किंवा भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३६३, कलम ३६५, कलम ३६६, कलम ३६६-क, कलम ३६६-ख, कलम ३६७, कलम ३६८, कलम ३७०, कलम ३७१, कलम ३७२, किंवा कलम ३७३ अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषसिद्धी झालेली असेल व तिला दोन वर्षांच्या किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आलेली असेल ; किंवा

(ख) कोणत्याही अन्य देशातील न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने, जो अपराध भारतात केला असल्यास या अधिनियमाअन्वये किंवा वर सांगितलेल्या कोणत्याही कलमांन्वये तेवढ्याच कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरली असेल अशा अपराधाबद्दल दोषसिद्धी झालेली असेल ;

तेव्हा ती कारावासातून मुक्त झाल्यानंतर पाच वर्षांचा कालावधीच्या आत जर पुन्हा या अधिनियमान्वये किंवा त्यापैकी कोणत्याही कलमांन्वये, शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल न्यायालयाने दिलेल्या दोन वर्षांच्या किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासास दोषसिद्ध ठरली तर, असे न्यायालय त्याला योग्य वाटल्यास अशा व्यक्तीला कारावासाची शिक्षा देण्याच्या वेळेस, असाही आदेश देऊ शकेल की, त्याच्या सुटकेनंतर त्याचे निवासस्थान किंवा अशा निवासस्थानातील बदल किंवा त्या निवासस्थानातील अनुपस्थिती कलम २३ अन्वये केलेल्या नियमानुसार, त्या शिक्षेच्या समाप्तीच्या दिनांकापासून पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी अधिसूचित करण्यात यावी.

(२) जर अशी अपराधसिद्धी अपील केल्यावरून किंवा अन्यथा रद्द झाली असेल तर, असा आदेश शून्य ठरेल.

(३) या कलमाखालील आदेश, पुनरीक्षण अधिकाराचा वापर करून अपील न्यायालय किंवा उच्च न्यायालयही देऊ शकेल.

(४) कोणत्याही व्यक्तीवर, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही नियमांचा भंग केल्याचा दोषारोप असेल ; तिचे निवासस्थान म्हणून शेवटी अधिसूचित केलेली जागा ज्या जिल्ह्यात असेल तेथील सक्षम अधिकारिता असणारा दंडाधिकारी तिची संपरीक्षा करु शकेल.

**१२. [सराईत गुन्हेगाराकडून सदाचरणासाठी प्रतिभूती. ]** स्त्रिया व मुली अपव्यापार दमन (विशोधन) अधिनियम, १९८६ (१९८६ चा ४४) कलम १२ द्वारे निरसित (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून ).

**विशेष पोलीस अधिकारी आणि सल्लागार संस्था.**

**१३.** (१) राज्य शासनाने या संबंधात विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक क्षेत्रासाठी, या अधिनियमान्वये त्या क्षेत्रातील अपराधांवर कार्यवाही करण्यासाठी त्या शासनाद्वारे किंवा त्याच्या वतीने विशेष पोलीस अधिकारी नियुक्त केला जाईल.

[१][(२) विशेष पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षकापेक्षा निम्न श्रेणीचा नसेल.

(२क) जिल्हा दंडाधिकारी, जर त्यास तसे करणे आवश्यक किंवा इष्ट वाटले तर, विशिष्ट प्रकरणांच्या किंवा प्रकरणांच्या वर्गांच्या किंवा सर्वसाधारण प्रकरणांच्या बाबतीत या अधिनियमान्वये विशेष पोलीस अधिकाऱ्यास प्रदान केलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार, कोणत्याही निवृत्त पोलीस किंवा सैनिकी अधिकाऱ्याला प्रदान करील :

परंतु, असा कोणताही अधिकार, —

(क) कोणत्याही निवृत्त पोलीस अधिकाऱ्याला, त्या अधिकाऱ्याने निवृत्तिच्यावेळी निरीक्षकाच्या श्रेणीपेक्षा निम्न श्रेणीचे नसलेले पद धारण केलेले असल्याखेरीज, प्रदान केला जाणार नाही ;

(ख) कोणत्याही निवृत्त सैनिक अधिकाऱ्याला, त्या अधिकाऱ्याने निवृत्तिच्यावेळी राजादिष्ट अधिकाऱ्याच्या श्रेणीपेक्षा निम्न श्रेणीचे नसलेले पद धारण केलेले असल्याखेरीज, प्रदान केला जाणार नाही ;

(३) या अधिनियमाखालील अपराधासंबंधीची त्याची कर्तव्ये कार्यक्षमतेने पार पाडता येण्यासाठी,—

(क) राज्य शासनास योग्य वाटतील इतके दुय्यम पोलीस अधिकारी (जेथे जेथे व्यवहार्य असेल तेथे महिला पोलीस अधिकाऱ्यांसह ) त्या क्षेत्राच्या विशेष पोलीस अधिकाऱ्यास सहाय्य करतील ;

---

[१] १९७८ चा अधिनियम ४४, कलम ९ द्वारे पोटकलम (२) ऐवजी दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

(ख) राज्य शासन, विशेष पोलीस अधिकाऱ्याच्या जोडीला, त्या क्षेत्रातील पाच पेक्षा अधिक नसतील इतक्या प्रमुख समाजकल्याण कार्यकर्त्यांचा (जेथे जेथे व्यवहार्य असेल तेथे महिला समाजकल्याण कार्यकर्त्यांसह) समावेश असलेले एक अशासकीय सल्लागार मंडळ, या अधिनियमाच्या कामाच्या संबंधातील सर्वसाधारण महत्त्वाच्या प्रश्नांबाबत त्याला सल्ला देण्याकरिता देऊ शकेल.

[१][(४) केंद्र सरकार, या अधिनियमाखालील किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखालील व्यक्तीच्या लैंगिक छळवणुकीसंबंधात आणि एकापेक्षा अधिक राज्यात घडलेल्या कोणत्याही अपराधाचे अन्वेषण करण्याच्या प्रयोजनार्थ, अपव्यापार पोलीस अधिकारी म्हणून पोलीस अधिकाऱ्यांची नेमणूक करील आणि ते, या अधिनियमान्वये विशेष पोलीस अधिकाऱ्यास वापरण्याजोगे असतील अशा सर्व अधिकारांचा वापर करतील व अशी सर्व कामे पार पाडतील आणि ते सर्व अधिकार व ती सर्व कामे ते संपूर्ण भारताच्या संबंधात पार पाडतील, असा त्यात फेरफार करण्यात येईल.]

**दखलपात्र अपराध.**

**१४.** [२][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)] यामध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध, त्या संहितेच्या अर्थांतर्गत दखलपात्र अपराध असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, या संहितेत काहीही अंतर्भूत असले तरी,—

(एक) फक्त विशेष पोलीस अधिकाऱ्याद्वारे किंवा त्याच्या निदेशनानुसार किंवा मार्गदर्शनाखाली किंवा त्याच्या पूर्वमान्यतेच्या अधीनतेने वॉरंटशिवाय अटक करता येईल ;

(दोन) जेव्हा विशेष पोलीस अधिकारी, त्याच्या हाताखालील कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्यास, त्याच्या स्वतःच्या उपस्थितीत नव्हे तर अन्यथा कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमाखालील अपराधाबद्दल वॉरंटशिवाय अटक करण्यास फर्मावील तेव्हा तो त्या दुय्यम अधिकाऱ्यास लेखी आदेश देईल व त्यात, अटक करावयाची व्यक्ती आणि ज्या अपराधाकरता अटक करण्यात येत आहे तो अपराध विनिर्दिष्ट करील ; आणि तो दुय्यम अधिकारी त्या व्यक्तीला अटक करण्यापूर्वी त्या आदेशातील विषयाची त्याला माहिती देईल आणि त्या व्यक्तीने मागणी केल्यास तो आदेश त्या व्यक्तीस दाखवील ;

(तीन) [३][पोलीस उपनिरीक्षका] च्या श्रेणीपेक्षा निम्नश्रेणीचा नसलेला, विशेष पोलीस अधिकाऱ्याद्वारे विशेषकरून प्राधिकृत केलेल्या कोणत्याही पोलीस अधिकारी, जर त्याला असे वाटण्यास कारण असेल की, विशेष पोलीस अधिकाऱ्याचा आदेश मिळण्यास विलंब झाल्यामुळे, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधांसंबंधीचा बहुमूल्य पुरावा नष्ट केला जाऊ शकेल किंवा तो लपविता येऊ शकेल किंवा जिने तो अपराध केला असेल किंवा केला असल्याचा संशय असेल अशी व्यक्ती पळून जाण्याची शक्यता आहे किंवा त्या व्यक्तीचे नाव व पत्ता माहीत नसेल किंवा तिने खोटे नाव किंवा पत्ता दिला आहे असा संशय घेण्यास कारण असेल, तर तो पोलीस अधिकारी, अशा आदेशाशिवाय संबंधित व्यक्तीस अटक करू शकेल, परंतु, अशा प्रकरणांमध्ये तो शक्य होईल तितक्या लवकर, विशेष पोलीस अधिकाऱ्यास त्या अटकेबाबत आणि ती अटक ज्या परिस्थितीत करण्यात आली त्या परिस्थितीबाबत कळवील.

**वॉरंटशिवाय झडती घेणे.**

**१५.** (१) त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा जेव्हा विशेष पोलीस अधिकारी [३][किंवा, यथास्थिति, अपव्यापार पोलीस अधिकारी] याला असे मानण्यास वाजवी कारण असेल की, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध एखाद्या जागेत राहणाऱ्या [४][व्यक्तीच्या] बाबतीत घडलेला आहे किंवा घडत आहे आणि वॉरंट घेऊन त्या जागेची झडती घेण्यास अवाजवी विलंब होण्याची शक्यता आहे तर, असा अधिकारी, त्याला तसे वाटल्यास त्याची कारणे नमूद करून अशा जागेत वॉरंटशिवाय प्रवेश करू शकेल आणि झडती घेऊ शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये झडती घेण्यापूर्वी विशेष पोलीस अधिकारी [३][किंवा, यथास्थिति, अपव्यापार पोलीस अधिकारी] झडती घेण्याची जागा ज्या वस्तीमध्ये असेल त्या ठिकाणच्या दोन किंवा अधिक प्रतिष्ठित रहिवाशांना (यांपैकी किमान एक महिला असेल) झडतीच्या वेळी उपस्थित राहण्यास आणि साक्षीदार होण्यास बोलावील आणि तशा अर्थाचा लेखी आदेश त्यांना किंवा त्यांच्यातील कोणालाही जारी करू शकेल :

---

[१] १९८६ चा अधिनियम ४४, कलम १५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[२] १९७८ चा अधिनियम ४६, कलम १० द्वारे दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[३] १९८६ चा अधिनियम ४४, कलम १६ द्वारे समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे, दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[१][परंतु, झडती घेण्याची जागा ज्या वस्तीमध्ये असेल तेथील प्रतिष्ठित रहिवाशी असण्याची अट झडतीच्या वेळी उपस्थित राहून साक्षीदार होण्यास सांगण्यात आलेल्या महिलेच्या बाबतीत लागू होणार नाही.]

(३) जी कोणतीही व्यक्ती, या कलमान्वये केल्या जाणाऱ्या झडतीच्या वेळी उपस्थित राहून साक्षीदार होण्याचा लेखी आदेश तिला देण्यात किंवा पाठविण्यात आल्यानंतर तसे करण्यास, वाजवी कारणाशिवाय नकार देईल किंवा हयगय करील तर, तिने भारतीय दंड संहिता (१९६० चा ४५) याच्या कलम १८७ अन्वये अपराध केला असल्याचे मानण्यात येईल.

[२][(४) विशेष पोलीस अधिकारी किंवा, यथास्थिति, अपव्यापार पोलीस अधिकारी, पोटकलम (१) अन्वये कोणत्याही जागी प्रवेश करील तेव्हा तो त्या जागेत आढळणाऱ्या सर्व व्यक्तींना त्यातून काढून टाकण्यास हक्कदार असेल.]

(५) विशेष पोलीस अधिकारी [३][किंवा, यथास्थिति, अपव्यापार पोलीस अधिकारी] [४][पोटकलम (४) अन्वये [५][व्यक्तीस] ] काढून टाकल्यानंतर तात्काळ त्याला समुचित दंडाधिकाऱ्यासमोर हजर करील.

[३][(५क) पोटकलम (५) अन्वये दंडाधिकाऱ्यासमोर हजर केलेल्या कोणत्याही व्यक्तींची त्या व्यक्तीच्या वयाच्या निश्चितीच्या प्रयोजनार्थ किंवा लैंगिक अत्याचारामुळे झालेल्या कोणत्याही जखमांच्या तपासणीसाठी किंवा लैंगिक संबंधामुळे कोणताही रोग संक्रमित झालेला आहे का हे पाहण्यासाठी नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीद्वारे तपासणी करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमात " मान्यताप्राप्त वैद्यक व्यवसायी " याचा अर्थ, भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) मध्ये दिल्याप्रमाणेच आहे.]

(६) झडतीमध्ये भाग घेणारा किंवा झडतीच्या वेळी उपस्थित राहणारा आणि झडतीचा साक्षीदार असणारा विशेष पोलीस अधिकारी [३][किंवा, यथास्थिति, अपव्यापार पोलीस अधिकारी] आणि इतर व्यक्ती यांच्या विरूद्ध झडतीच्या प्रयोजनार्थ, किंवा त्यासंबंधात करण्यात आलेल्या कोणत्याही कायदेशीर कृतीबद्दल कोणतीही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाही केली जाण्यास ते पात्र ठरणार नाहीत.

[३][(६क) या कलमान्वये, झडती घेणारा विशेष पोलीस अधिकारी, किंवा, यथास्थिति, अपव्यापार पोलीस अधिकारी, याच्यासोबत कमीत कमी दोन महिला पोलीस अधिकारी असतील आणि जेथे पोटकलम ४ अन्वये काढून टाकलेल्या कोणत्याही महिलेस किंवा मुलीस प्रश्न विचारण्याची गरज असेल तेथे ते काम महिला पोलीस अधिकाऱ्याद्वारे केले जाईल आणि जर महिला पोलीस अधिकारी उपलब्ध नसेल तर, मान्याताप्राप्त कल्याण संस्थेच्या किंवा संघटनेच्या महिला सदस्याच्या उपस्थितीतच फक्त प्रश्न विचारण्याचे काम केले जाईल.

**स्पष्टीकरण.**—हे, पोटकलम आणि कलम १७-क यांच्या प्रयोजनार्थ, " मान्याताप्राप्त कल्याणकारी संस्था किंवा संघटना " याचा अर्थ, राज्य शासन यासंबंधात मान्यता देईल अशी संस्था किंवा संघटना, असा आहे.]

[१][(७) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या तरतुदी, शक्य होईल तेथवर, उक्त संहितेच्या कलम ९४ अन्वये जारी केलेल्या वॉरंटच्या प्राधिकाराअन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही झडतीस जशा लागू होतात त्या या कलमान्वये केलेल्या कोणत्याही झडतीस लागू होतील.]

व्यक्तीची सुटका

[६][**१६.** (१) जेव्हा दंडाधिकाऱ्याला पोलिसाने किंवा राज्य शासनाने यासंबंधात अन्यथा प्राधिकार दिलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने दिलेल्या माहितीवरून असे मानण्यास कारण असेल की, [७][एखादी व्यक्ती कुंटणखान्यात रहात आहे किंवा वेश्याव्यवसाय करीत आहे, किंवा करण्यास भाग पाडली जात आहे] तेव्हा त्याला, उपनिरीक्षकाच्या दर्जापेक्षा निम्न श्रेणीच्या नसलेल्या पोलीस अधिकाऱ्यास, त्या कुंटणखान्यात प्रवेश करण्याचा आणि त्यातून त्या [५][व्यक्तीला] काढून टाकण्याचा आणि आपल्यासमोर हजर करण्याचा निदेश देता येईल. ]

---

[१] १९७८ चा अधिनियम ४६, कलम ११ द्वारे समाविष्ट केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[२] १९८६ चा अधिनियम ४४, कलम १६ द्वारे पोट- कलम (४) ऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[३] १९८६ चा अधिनियम ४४, द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[४] १९७८ चा अधिनियम ४६, कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[५] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[६] वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[७]. १९८६ चा अधिनियम ४४, कलम १७, द्वारे खंड (क) आणि (ख) ऐवजी बदली दाखल करण्यात आला (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(२) पोलीस अधिकारी, त्या [1][व्यक्तीस] बाहेर काढल्यावर तात्काळ तिला, आदेश देणाऱ्या दंडाधिकाऱ्यासमोर हजर करील.

**कलम १५ अन्वये काढून टाकलेल्या किंवा कलम १६ अन्वये सुटका केलेल्या व्यक्तींची दरम्यानची अभिरक्षा.**

**१७.** (१) जेव्हा, कलम १५ च्या पोटकलम (४) अन्वये एखाद्या [1][व्यक्तीला] काढून टाकणारा विशेष पोलीस अधिकारी किंवा १६ च्या पोटकलम (१) अन्वये एखाद्य [1][व्यक्तीची] सुटका कारणारा पोलीस अधिकारी, कलम १५ च्या पोटकलम (५) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्या व्यक्तीस समुचित दंडाधिकाऱ्यापुढे, कलम १६ च्या पोटकलम (२) अन्वयेआदेश काढणाऱ्या दंडाधिकाऱ्यापुढे सादर करण्यास कोणत्याही कारणामुळे असमर्थ असेल तेव्हा तो त्या व्यक्तीस, तात्काळ जवळच्या कोणत्याही वर्गाच्या दंडाधिकाऱ्यापुढे सादर करील आणि तो दंडाधिकारी, त्या व्यक्तीस समुचित दंडाधिकाऱ्यासमोर, किंवा यथास्थिति, आदेश काढणाऱ्या दंडाधिकाऱ्यासमोर सादर करीपर्यंत, त्या व्यक्तीच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी त्याला योग्य वाटेल असा आदेश काढील :

परंतु, कोणत्याही [1][व्यक्तीस],—

(एक) या पोटकलमाखालील आदेशाच्या दिनांकापासून दहा दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी या पोट-कलमान्वये अभिरक्षेत स्थानबद्ध करण्यात येणार नाही ; किंवा

(दोन) त्या व्यक्तीवर जी हानिकारक प्रभाव पाडील अशा कोणत्याही व्यक्तीकडे परत पाठवणार नाही किंवा तिच्या अभिरक्षेत ठेवण्यात येणार नाही.

(२) जेव्हा त्या [1][व्यक्तीस] कलम १५च्या पोट-कलम (५) अन्वये समुचित दंडाधिकाऱ्यासमोर किंवा कलम १६ च्या पोट कलम (२) अन्वये दंडाधिकाऱ्यासमोर सादर करण्यात येईल तेव्हा, तो त्या व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, कलम १६ च्या पोटकलम (१) अन्वये मिळालेल्या माहितीची अचूकता, त्या [1][व्यक्तीचे] वय, चारित्र्य आणि पूर्वचरित्र आणि तिचे आईवडील, पालक किंवा पती यांनी तिचा ताबा घेण्यासाठी त्यांची योग्ययोग्यता आणि तिला घरी पाठवल्यास घरच्या परिस्थितीचा तिच्यावर पडणारा प्रभाव याबाबत चौकशी करवून घेईल आणि या प्रयोजनासाठी अपराधी परीविक्षा अधिनियम, १९५८ (१९५८चा २०) अन्वये नियुक्त केलेल्या परीविक्षा अधिकाऱ्यास वरील परिस्थितीबाबत आणि त्या [1][व्यक्तीच्या] व्यक्तिमत्त्वाबाबत व तिच्या पुनर्वसनाच्या शक्याशक्यतेबाबत चौकशी करण्याचा निदेश देऊ शकेल.

(३) दंडाधिकारी, पोटकलम (२) अन्वये त्या प्रकरणात चौकशी करताना त्या [1][व्यक्तीच्या] सुरक्षित अभिरक्षेसाठी त्यास योग्य वाटतील असे आदेश देऊ शकेल :

[2][परंतु, कलम १६ अन्वये सुटका केलेली व्यक्ती जर बालक किंवा अज्ञान व्यक्ती असेल तर, मुलांच्या सुरक्षित अभिरक्षेकरिता त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही बाल अधिनियमान्वये कोणत्याही राज्यात स्थापन करण्यात आलेल्या किंवा मान्यताप्राप्त असलेल्या कोणत्याही संस्थेत अशा बालकाला किंवा अज्ञानी व्यक्तीला ठेवण्याची दंडाधिकाऱ्याला मुभा असेल :

परंतु, आणखी असे की,] या प्रयोजनासाठी कोणत्याही [1][व्यक्तीला] अशा आदेशाच्या दिनांकापासून तीन आठवड्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी अभिरक्षेत ठेवण्यात येणार नाही आणि कोणत्याही [1][व्यक्तीला] तिच्या हानिकारक प्रभाव पाडण्याजोग्या व्यक्तिच्या अभिरक्षेत ठेवण्यात येणार नाही.

(४) जेव्हा पोट कलम (२) अन्वये आवश्यक असलेली चौकशी करण्यात आल्यावर दंडाधिकाऱ्याचे,—

(क) मिळालेली माहिती बरोबर आहे ; आणि

(ख) त्याला दक्षतेची आणि संरक्षणाची गरज आहे,

याबाबत समाधान झाल्यास,

तो, पोटकलम (५) च्या परंतुकाच्या अधीनतेने, अशा [1][व्यक्तीस] एका वर्षापेक्षा कमी नसेल आणि तीन वर्षांपेक्षा जास्त नसेल, अशा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी सुरक्षागृहामध्ये किंवा त्यास योग्य वाटेल अशा व ज्याची कारणे लेखी नमूद करावी लागतील अशा अन्य अभिरक्षेमध्ये ठेवून घेण्यात यावे, असा आदेश देऊ शकेल :

---

[1] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[2] वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

परंतु, अशी अभिरक्षा ही धार्मिक प्रवृत्ती असणाऱ्या व्यक्तीची किंवा व्यक्ती निकायाची नसेल आणि त्या व्यक्तीच्या अभिरक्षेहून भिन्न असेल आणि असे की, त्या [१][व्यक्तीचा] ताबा ज्यांच्याकडे सोपवण्यात आला असेल त्या [१][व्यक्तीनी] तसेच सुरक्षागृहाच्या प्रभारी व्यक्तीनीसुद्धा, आवश्यक व शक्य असेल तेथे, [१][व्यक्तीची] योग्य काळजी, पालकत्व, शिक्षण, प्रशिक्षण तसेच वैद्यकीय उपचार व मानसोपचार यासंबंधातील त्याचबरोबर न्यायालयाकडून नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीव्दारे देखरेख यासंबंधातील निदेशानुसार हमी देणारे बंधपत्र करून देणे आवश्यक असेल, आणि हे बंधपत्र तीन वर्षांहून अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता अंमलात असेल.

(५) दंडाधिकारी, पोटकलम (२) अन्वये त्यांची कर्तव्ये पार पाडीत असताना पाच प्रतिष्ठित व्यक्तींच्या पथकास त्यांस सहाय्य करण्याकरिता बोलावून घेईल व जेथे व्यवहार्य असेल तेथे त्यातील तीन व्यक्ति महिला असतील ; आणि या प्रयोजनार्थ, [१][व्यक्तींच्या] अनैतिक व्यापाराचे दमन करण्याच्या विषयात अनुभवी असणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांची, विशेषतः महिला समाज कल्याण अधिकाऱ्यांची एक यादी आपल्याकडे ठेवील.

(६) पोटकलम (४) अन्वये दिलेल्या आदेशाविरुद्ध कारावयाचे अपील सत्र न्यायालयाकडे करता येईल आणि अशा न्यायालयाच्या त्या अपिलावरील निर्णय अंतिम असेल.

**कलम १६ अन्वये सुटका करण्यात आलेल्या व्यक्तींना त्यांचे मातापिता किंवा पालक यांच्याकडे सुपूर्द करण्यापूर्वी पाळावयाच्या शर्ती.**

[२][**१७क.** कलम १७ च्या पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १७ अन्वये चौकशी करणारा दंडाधिकारी, कलम १६ अन्वये सुटका केलेल्या कोणत्याही व्यक्तीला तिचे मातापित्रा, पालक किंवा पती यांच्याकडे सुपूर्द कारण्याचा आदेश जारी करण्यापूर्वी, ते मातापिता, पालक किंवा पती यांची त्या व्यक्तिला ठेवून घेण्याची क्षमता व खरेपणा याबाबत मान्यताप्राप्त कल्याणकारी संस्थेद्वारे किंवा संघटनेद्वारे अन्वेषण करवून स्वतः ची खात्री करून घेईल.]

**कुंटणखाना बंद करणे अणि अपराध्यांना त्या जागेतून बाहेर काढणे.**

**१८.** (१) दंडाधिकारी, कलम ७ च्या पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही सार्वजनिक ठिकाणांपासून [३][दोनशे मीटर] अंतराच्या आतील कोणतेही घर, खोली, जागा किंवा त्याचा कोणताही भाग येथे कोणत्याही व्यक्तीकडून कुंटणखाना चालवला जात आहे किंवा त्याचा तसा वापर केला जात आहे किंवा वेश्या त्यांचा धंदा करण्यासाठी त्याचा वापर करीत आहेत, अशी पोलिसांकडून किंवा इतरांकडून माहिती मिळाल्यावरून अशा घराच्या, खोलीच्या, जागेच्या किंवा त्याच्या भागाच्या मालकाला, पट्टाकाराला किंवा घर मालकाला किंवा मालकाच्या, पट्टाकाराच्या किंवा घरमालकाच्या एजंटाला किंवा असे घर, खोली, जागा किंवा भाग यांच्या भाडेकरूस, पट्टेदारास, भोगवटादारास किंवा त्याचा ताबा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, नोटीस देऊ शकेल आणि ती नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत, त्यांचा अयोग्य वापर केल्याबद्दल त्यावर जप्ती का आणू नये याची कारणे दाखवण्यास फर्मावू शकेल ;

आणि जर, संबंधित व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्यावर, दंडाधिकाऱ्याचे, ते घर, खोली, जागा किंवा भाग याचा वापर कुंटणखाना म्हणून किंवा वेश्याव्यवसाय करण्याकरिता केला जात आहे, याबाबत समाधान झाले तर, दंडाधिकारी,---

(क) आदेश दिल्यानंतर सात दिवसांच्या आत ते घर, खोली किंवा जागा किंवा त्यांचा भाग यातून भोगवटादाराला निष्कासित करावे असा निदेश देणारा ;

(ख) एका वर्षाच्या कालावधी दरम्यान ती भाड्याने देण्यापूर्वी किंवा [४][कलम १५ अन्वये घेतलेल्या अशा घराच्या, खोलीच्या, जागेच्या किंवा त्याच्या भागाच्या झडतीत एखादे बालक किंवा अज्ञान व्यक्ती सापडल्यास, आदेश दिल्यानंतर लगेचच तीन वर्षांच्या कालावधी दरम्यान ] मालकाला, पट्टाकाराला किंवा घरमालकाला किंवा मालकाच्या, पट्टाकाराच्या किंवा घरमालकाच्या एजंटाला, दंडाधिकाऱ्याची पूर्वमान्यता घ्यावी लागेल असा निदेश देणारा आदेश देऊ शकेल :

परंतु, जर दंडाधिकाऱ्याला असे आढळले की, मालक, पट्टाकार किंवा घरमालक त्याचप्रमाणे मालकाचा, पट्टाकाराचा किंवा घर मालकाचा एजंट, घराचा, खोलीचा, जागेचा किंवा भागाचा अयोग्य वापर करण्याबाबत अनभिज्ञ आहे तर तो, मालकाला, पट्टाकाराला किंवा घरमालकाला ते घर, खोली, जागा किंवा भाग परत करवील असा निदेश देईल का, ते घर, खोली, जागा किंवा भाग त्याचा अयोग्य वापर करण्यास परवानगी देणाऱ्या व्यक्तीला किंवा त्या व्यक्तीच्या फायद्यासाठी भाडेपट्ट्याने देऊ नये किंवा अन्यप्रकारे तिच्या ताब्यात देऊ नये.

---

[१] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[३] १९७८ चा अधिनियम ४६, कलम १३ द्वारे दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[४] १९८६ चा अधिनियम ४४, कलम २० द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(२) कलम ३ किंवा कलम ७ अन्वये एखाद्या व्यक्तीस, सिद्धदोष ठेरवणारे न्यायालय, पोटकलम (१) अन्वये, त्या पोटकलमात आवश्यक असल्याप्रणामे अशा व्यक्तीला कारणे दाखविण्याची पुढील नोटीस दिल्याशिवाय, आदेश देऊ शकेल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये दंडाधिकाऱ्याने किंवा न्यायालयाने दिलेले आदेश, अपिलाधीन नसतील आणि कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने दिलेल्या आदेशाद्वारे ते तहकूब किंवा रद्द करता येणार नाहीत आणि [१][यथास्थिति, एका वर्षाच्या किंवा तीन वर्षांच्या समाप्तीनंतर ] उक्त आदेशाची विधिग्रह्यता समाप्त होईल :

परंतु, कलम ३ किंवा कलम ७ अन्वये केलेली दोषसिद्धी जेव्हा, असे घर, खोली, जागा किंवा त्याचा कोणताही भाग यात कुंटणखाना चालवला जात नाही किंवा त्याच्या कुंटणखाना म्हणून वापर केला जात नाही किंवा वेश्या त्याचा वापर आपल्या व्यवसायासाठी करीत नाहीत या कारणावरून अपिलास रद्द ठरवण्यात येईल तेव्हा, पोट कलम (१) अन्वये संपरीक्षा न्यायालयाने दिलेला कोणताही आदेशरद्द होईल.

(४) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा दंडाधिकारी पोटकलम (१) अन्वये आदेश देईल किंवा न्यायालय पोटकलम (२) अन्वये आदेश देईल तेव्हा, ज्या अन्वये त्यावेळी ते घर, खोली, जागा किंवा त्याचा भाग ताब्यात घेतलेला असेल असा कोणताही भाडेपट्टा किंवा करार शून्य अप्रवर्ती ठरेल.

(५) जेव्हा मालक, पट्टाकार किंवा घरमालक किंवा अशा मालकाचा, पट्टाकाराचा किंवा घरमालकाचा एजंट, पोटकलम (१) च्या खंड (ख) खाली दिलेल्या निदेशांचे अनुपालन करण्यास कसूर करील तेव्हा तो पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल किंवा जेव्हा तो त्या पोटकलमाच्या परंतुकाखालील निदेशांचे पालन करण्यास कसूर करील तेव्हा त्याने कलम ३ च्या पोटकलम (२) च्या खंड (ख) अन्वये किंवा, यथास्थिति, कलम ७ च्या पोटकलम (२) च्या खंड (ग) अन्वये अपराध केल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार त्यास शिक्षा होईल.

**सुरक्षागृहात ठेवण्यात यावे यासाठी किंवा न्यायालयाकडून देखरेख व संरक्षण व्हावे यासाठी अर्ज.**

[२][**१९.** (१) जी [३][व्यक्ती] वेश्याव्यवसाय करीत असेल किंवा जिला तो करण्यास भाग पाडले जात असेल तिला, ती ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये वेश्याव्यवसाय करीत असेल, किंवा तिला तो करण्यास भाग पाडले जात असेल त्या दंडाधिकाऱ्यापुढे पुढील आदेशासाठी अर्ज करू शकेल,—

(क) तिला सुरक्षागृहात ठेवण्यात यावे, किंवा

(ख) पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने तिला न्यायालयाद्वारे देखरेख व संरक्षण मिळावे.

(२) दंडाधिकारी, पोटकलम (३) अन्वये, चौकशी होईपर्यंत, त्या [३][व्यक्तीला], प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन, त्याला योग्य वाटेल अशा अभिरक्षेत ठेवण्यात यावे असा निदेश देऊ शकेल.

(३) जर दंडाधिकाऱ्याची, अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि त्याला आवश्यक वाटणारी चौकशी केल्यानंतर, यात अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ (१९५८ चा २०) अन्वये नियुक्त केलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्याने, अर्जदाराने, अर्जदाराचे व्यक्तिमत्व, घरची स्थिती, आणि अर्जदाराच्या पुनर्वसनाबाबची संभाव्यता याविषयी करावयाच्या चौकशीचा समावेश होतो —अशी खात्री झाली की, या कलमाखाली आदेश दिला पाहिजे तर तो, कारणे नमूद करून असा आदेश देईल की, अर्जदारास —

(एक) सुरक्षागृहात, किंवा

(दोन) सुधारसंस्थेत, किंवा

(तीन) दंडाधिकाऱ्याने, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या अशा कालावधीकरिता नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या देखरेखीखाली ठेवण्यात यावे.]

**कोणत्याही जागेतून वेश्येला काढून टाकणे.**

**२०.** (१) दंडाधिकाऱ्यास, त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमेतील एखाद्या जागेत राहत असलेली किंवा तेथे वारंवार येत असलेली कोणतीही [३][व्यक्ती] वेश्या असल्याची माहिती मिळाल्यास तो त्या माहितीतील तथ्य नमूद करील आणि तो, अशा [३][व्यक्तीला], दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित राहणे आवश्यक करणारी व त्याला त्या जागेतून काढले का जाऊ नये आणि तेथे पुन्हा प्रवेश करण्यास मनाई का करू नये याची कारणे दाखवण्यास फर्मावणारी नोटीस देईल.

---

[१] १९८६ चा अधिनियम ४४, कलम २० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[२] १९७८ चा अधिनियम ४६, कलम १४ द्वारे कलम १९ ऐवजी दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[३] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) अन्वये दिलेल्या, प्रत्येक नोटीशीसोबत, वर सांगितलेल्या अभिलेखाची प्रत असेल आणि जिच्याविरुद्ध नोटीस दिली आहे, त्या व्यक्तीला नोटिशीसोबत ती प्रतही दिली जाईल.

(३) दंडाधिकारी, पोटकलम (२) मध्ये निर्देशित केलेल्या नोटीस बजावल्यानंतर, मिळालेल्या माहितीच्या सत्यतेची चौकशी चालू करील आणि त्या [1][व्यक्तीला] पुरावा दाखल करण्याची संधी दिल्यानंतर, त्याला योग्य वाटेल, असा आणखी पुरावा घेईल आणि जर अशा चौकशीवरून, त्याला असे दिसून आले की, अशी [1][व्यक्ती] वेश्या आहे आणि जनतेच्या हिताच्या दृष्टीने तेथून काढून टाकणे आणि तेथे पुनःप्रवेश करण्यास मनाई करणे आवश्यक आहे तर दंडाधिकारी, त्या [1][व्यक्तीला] आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, दिलेल्या लेखी आदेशाद्वारे (आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या) दिनांकानंतर जो आदेशाच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आतील नसेल अशा जागेतून निघून दुसऱ्या जागी-मग ती दुसरी जागा त्याच्या अधिकारितेच्या मर्यादेत असो किंवा नसो आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या अशा मार्गाने किंवा मार्गानी व तेवढ्या कालावधीत जाण्यास फर्मावील आणि अशा जागेवर अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय, तिला त्या जागेत पुनः प्रवेश करण्यास मनाई करेल.

(४) जी कोणी,—

(क) या कलमान्वये दिलेल्या आदेशाचे, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत अनुपालन करण्यास कसूर करील किंवा त्या जागेत परवानगीशिवाय पुनः प्रवेश करण्यास मनाई करणारा आदेश अंमलात असेल तोवर अशा परवानगीशिवाय त्या जागेत पुन्हा प्रवेश करील, किंवा

(ख) या पोटकलमन्वये, कोणत्याही [1][व्यक्तीला] त्या जागेतून निघून जाणे आवश्यक केले आहे आणि तिने तेथे पुन्हा प्रवेश करण्यास घ्यावी लागणारी परवानगी घेतलेली नाही हे माहीत असतानाही अशा व्यक्तीला त्या जागेत आसरा देईल किंवा लपवील,

ती व्यक्ती दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास व अपराध करणे चालू ठेवण्याच्या प्रकरणी, पहिल्या अपराधानंतर तिने किंवा त्याने, तो अपराध करणे चालू ठेवण्याच्या, प्रत्येक दिवसास, वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**सुरक्षागृहे.** **२१.** (१) राज्य शासन, त्याच्या विवेकाधिकारानुसार, [2][त्याला योग्य वाटतील इतकी सुरक्षागृहे व सुधार संस्था या अधिनियमाअन्वये स्थापन करू शकेल आणि अशी स्थापन केलेली सुरक्षागृहे आणि संस्था] विहित करण्यात येईल अशा रीतीने चालविण्यात येतील.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, या कलमाअन्वये राज्य शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या लायसनशिवाय व त्याच्या शर्तींना अनुसरून असल्याशिवाय, राज्य शासनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला कोणत्याही सुरक्षागृहाची किंवा सुधारसंस्थांची स्थापना करता येणार नाही किंवा ती चालविता येणार नाहीत.

(३) राज्य शासन, एखाद्या व्यक्तीने किंवा प्राधिकरणाने याबाबत केलेल्या अर्जावरून अशा व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला, [2][सुरक्षागृह किंवा सुधार संस्था] स्थापन करून चालविण्यासाठी किंवा, यथास्थिति,चालविण्यासाठी विहित नमुन्यात लायसन देईल आणि अशा देण्यात आलेल्या लायसनमध्ये, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांना अनुसरून राज्य शासनाला योग्य वाटतील अशा शर्ती अंतर्भूत असतील :

परंतु, त्यातील अशा कोणत्याही शर्तींद्वारे [2][सुरक्षागृहाचे किंवा सुधार संस्थेचे ] व्यवस्थापन, जेव्हा व्यवहार्य असेल तेव्हा, स्त्रियांकडे सोपवणे आवश्यक करता येईल :

परंतु, आणखी असे की, या अधिनियमाच्या प्रारंभी कोणतेही सुरक्षागृह चालविणाऱ्या व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला अशा लायसनसाठी अशा प्रारंभापासून सहा महिन्यांच्या कालावधीत अर्ज करण्याची परवानगी असेल :

[3][परंतु, स्त्रिया व मुली अपव्यापार दमन (विशोधन) अधिनियम, १९७८ (१९७८ चा ४६) याच्या प्रारंभी कोणतीही सुधारसंस्था चालविणाऱ्या व्यक्तीला अशा प्रारंभापासून सहा महिन्यांच्या कालावधीत अर्ज करण्याची परवानगी असेल.]

(४) राज्य शासन, लायसन देण्यापूर्वी, त्या प्रयोजनार्थ, नियुक्ती करण्यात येईल अशा अधिकाऱ्याला किंवा प्राधिकाऱ्याला त्यासंबंधात मिळालेल्या अर्जाच्या बाबतीतील सर्व किंवा संपूर्ण अन्वेषण करण्यास आणि अशा अन्वेषणाचा निष्कर्ष कळविण्यास फर्मावू शकेल, आणि असे कोणतेही अन्वेषण करताना, अधिकारी, विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीचे अनुसरण करेल.

(५) ते लायसन, जर ते तत्पूर्वी रद्द झाले नाही तर त्या लायसनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा कालावधीसाठी अंमलात राहील आणि त्याच्या समाप्तीच्या दिनांकापूर्वी कमीत कमी तीस दिवस अगोदर ते नवीकरण करण्यासाठी अर्ज केला असल्यास तेवढ्याच कालावधीकरिता त्याचे नवीकरण होईल.

---

[1] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[2] १९७८ चा अधिनियम ४६, कलम १५ द्वारे दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[3] वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे सामाविष्ट केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

(६) या अधिनियमान्वये दिलेले किंवा नवीकरण केलेले, कोणतेही लायसन हस्तांतरणीय असणार नाही.

(७) या अधिनियमान्वये जिला लायसन मिळाले आहे अशी कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकरण, किंवा अशा व्यक्तीचा किंवा प्राधिकरणाचा कोणताही एजंट किंवा कर्मचारी जेव्हा त्या लायसनच्या कोणत्याही शर्तीचा किंवा अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचा किंवा या अधिनियमाखाली केलेल्या नियमांच्या तरतूदीचा भंग करील किंवा राज्य शासन, कोणत्याही [१][सुरक्षागृहाची किंवा सुधारसंस्थांची ] स्थिती, व्यवस्थापन किंवा पर्यवेक्षण यासंबंधात समाधानी नसेल तर अशा बाबतीत, राज्य शासन या अधिनियमान्वये दिलेल्या अन्य कोणत्याही शास्तीस बाध न आणता, कारणे नमूद करून त्या कारणास्तव लेखी आदेशाद्वारे ते लायसन रद्द करू शकेल :

परंतु, लायसनधारकाला लायसन का रद्द करण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्याची संधी दिल्याखेरीज असा कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

(८) जेव्हा [१][सुरक्षागृहाच्या किंवा सुधारसंस्थांच्या ] बाबतीतील लायसन पूर्ववर्ती पोटकलमान्वये रद्द झाले असेल तेव्हा, असे [१][सुरक्षागृह किंवा सुधारसंस्था] लायसन रद्द झाल्याच्या दिनांकापासून कार्य करणे बंद करील.

(९) यासंबंधात केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, राज्य शासन या अधिनियमान्वये दिलेल्या किंवा नवीकरण केलेल्या कोणत्याही लायसनमध्ये बदल किंवा सुधारणा करू शकेल.

[१][(९-क) राज्य शासन किंवा यासंबंधात प्राधिकृत केलेले कोणतेही प्राधिकरण, यासंबंधात केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, सुरक्षागृहातील एखाद्या सहवाशांचे दुसऱ्या सुरक्षागृहात किंवा सुधारसंस्थेत, किंवा सुधारसंस्थेच्या एखाद्या सहवाशांचे दुसऱ्या सुधारसंस्थेत किंवा सुरक्षागृहात स्थानांतरण करणे हे जेव्हा त्या स्थानांतर करावयाच्या व्यक्तीच्या वागणुकीचा, तिला द्यावयाच्या प्राशिक्षणाचा आणि प्रकरणाच्या अन्य परिस्थितीचा विचार करता इष्ट असल्याचे समजण्यात येईल तेव्हा असे स्थानांतरण करील :

परंतु,—

(क) या कलमान्वये ज्या [२][व्यक्तीचे] स्थानांतरण झाले आहे तिला, स्थानांतरण झालेल्या सुधारगृहात किंवा सुधारसंस्थेत, जेथून तिचे स्थानांतरण झाले असेल त्या सुरक्षागृहात किंवा सुधारसंस्थेत तिने जेवढ्या कालावधीकरिता राहणे आवश्यक होते त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी राहणे आवश्यक असणार नाही,

(ख) या पोटकलमान्वये करावयाच्या स्थानांतरणाच्या प्रत्येक आदेशाकरिता कारणे नमूद करण्यात येतील.]

(१०) या कलमाच्या तरतुदींनुसार असेल त्याव्यतिरिक्त जो कोणी [१][सुधारगृह किंवा सुधारसंस्था] स्थापन करील किंवा चालवील, तो पहिल्या अपराधप्रकरणी एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधांच्या प्रकरणी एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन हजारांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

[३][अभिलेख सादर करणे.]

[३][ **२१-क.** कलम २१ च्या पोटकलम (३) अन्वये ज्या व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला सुरक्षागृह किंवा सुधारसंस्था स्थापन करण्यासाठी किंवा, यथास्थिति, चालविण्यासाठी लायसन मिळाले असेल ती व्यक्ती किंवा ते प्राधिकरण न्यायालयाकडून जेव्हा जेव्हा मागणी करण्यात येईल तेव्हा अशा सुरक्षागृहाने किंवा सुधारसंस्थेने ठेवलेले अभिलेख व अन्य कागदपत्रे न्यायालयासमोर सादर करील.]

[४][ संपरीक्षा. ]

**२२.** [४][महानगर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याच्या] न्यायालयाहून कनिष्ठ असलेले कोणतेही न्यायालय कलम ३, कलम ४, कलम ५, कलम ६, कलम ७ किंवा कलम ८ खालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.]

[५][विशेष न्यायालय स्थापन करण्याचा अधिकार.]

[५][**२२-क** (१) कोणत्याही जिल्ह्यात किंवा महानगर क्षेत्रात या अधिनियमान्वये खालील अपराधाची त्वरीत संपरीक्षा करण्याच्या प्रयोजनासाठी तसे करणे आवश्यक आहे याबाबत राज्य शासनाची खात्री झाली तर ते **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व उच्च न्यायालयाशी विचारविनियम करून, अशा जिल्ह्यात किंवा महानगर क्षेत्रात प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याचे किंवा, यथास्थिति, महानगर दंडाधिकाऱ्याचे एक किंवा अधिक न्यायालये स्थापन करू शकेल.

---

[१] १९७८ चा अधिनियम ४६, कलम १५ द्वारे दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[२] १९८६ चा अधिनियम ४४; कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम २१ द्वारे दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[४] १९७८ चा अधिनियम ४६, कलम १६ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[५] वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे कलम २२क २२ख सामाविष्ट केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

(२) उच्च न्यायालयाने निर्देशित केलेले असल्याखेरीज अन्यथा पोटकलम (१) अन्वये स्थापन केलेले न्यायालय फक्त या अधिनियमाखालील प्रकरणांच्या बाबतीत अधिकारितेचा वापर करील.

(३) पोटकलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने, पोटकलम (१) खाली कोणत्याही जिल्ह्यात किंवा महानगर क्षेत्रात स्थापन झालेल्या न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याच्या अधिकारितेचा आणि अधिकारांचा विस्तार, जिल्ह्यात सर्वत्र किंवा, यथास्थिति, महानगर क्षेत्रात सर्वत्र होईल.

(४) या कलमाच्या पूर्वगामी तरतुदींच्या अधीनतेने, पोटकलम (१) अन्वये कोणत्याही जिल्ह्यात किंवा महानगर क्षेत्रात स्थापन झालेले न्यायालय हे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम ११ च्या पोटकलम (१) खाली किंवा, यथास्थिति, कलम १६ च्या पोटकलम (१) खाली स्थापन झालेले न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार त्या संहितेच्या तरतुदी अशा न्यायालयाच्या बाबतीत लागू होतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमात, " उच्च न्यायालय " याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम २ च्या खंड (ङ) मधील अर्थासारखाच असेल.

केंद्र सरकारचा विशेष न्यायालये स्थापन करण्याचा अधिकार.

[१][**२२-कक.** (१) या अधिनियमाखालील आणि एकापेक्षा अधिक राज्यांमध्ये केलेल्या अपराधांची त्वरित संपरीक्षा करण्याच्या प्रयोजनार्थ, तसे करणे आवश्यक आहे याबाबत केंद्र सरकारची खात्री पटल्यास ते **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, अशा अपराधांच्या संपरीक्षेसाठी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांचा किंवा महानगर दंडाधिकाऱ्यांची एक किंवा अधिक न्यायालये स्थापन करू शकेल.

(२) कलम २२क च्या तरतुदी शक्य होईल तेथवर पोटकलम (१) अन्वये स्थापन केलेल्या न्यायालयाला त्या जशा या कलमान्वये स्थापन केलेल्या न्यायालयांना लागू होतात तशाच लागू होतील.]

प्रकरणांची संक्षिप्तरीत्या संपरीक्षा करण्याचा न्यायालायाचा अधिकार.

**२२ख.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, त्यास तसे करणे आवश्यक वाटल्यास, या अधिनियमाखालील अपराधांची दंडाधिकाऱ्याने तसेच [कलम २२क च्या पोटकलम (१) अन्वये स्थापन केलेल्या न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याने] संक्षिप्तरीत्या संपरीक्षा करावी, असा निदेश देऊ शकेल आणि उक्त संहितेची कलमे २६२ ते २६५ (दोन्ही धरून) याच्या तरतुदी अशा संपरीक्षेस, शक्य तेथवर लागू होतील :

परंतु, या कलमाखाली केलेल्या संक्षिप्त संपरीक्षेत झालेल्या कोणत्याही दोषसिद्धीच्या प्रकरणी, दंडाधिकाऱ्याने एका वर्षाच्या कालावधीपेक्षा अधिक नसलेल्या कारावासाची शिक्षा देणे कायदेशीर असेल :

परंतु, आणखी असे की, या कलमाखाली संक्षिप्त संपरीक्षेच्या प्रारंभी किंवा ती करताना दंडाधिकाऱ्यास जर, असे आढळून आले की, प्रकरणाचे स्वरूप असे आहे की एका वर्षापेक्षा अधिक कालावधीची कारावासाची शिक्षा दिली पाहिजे किंवा कोणत्याही इतर कारणासाठी त्या प्रकरणाची संक्षिप्त संपरीक्षा करणे इष्ट नाही तर, दंडाधिकारी पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तशा आशयाच्या आदेशाची नोंद करील आणि तद्नंतर ज्या कोणत्याही साक्षीदाराची तपासणी होणे आवश्यक असेल त्याला पुन्हा बोलावील आणि उक्त संहितेद्वारे तरतूद केलेल्या रीतीने प्रकरणाची सुनावणी किंवा फेरसुनावणी करण्याची कार्यवाही सुरू करील.]

नियम करण्याचा अधिकार.

**२३.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करू शकेल.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांत,—

(क) कोणत्याही जागा सार्वजनिक जागा म्हणून अधिसूचित करणे ;

[२][(ख) कलम १७ च्या पोटकलम (१) अन्वये ज्यांच्या सुरक्षित अभिरक्षेबाबत आदेश देण्यात आले असतील अशा व्यक्तींना अभिरक्षेत ठेवणे आणि त्यांचे परिरक्षण करणे ];

[३][(खख) कलम १०क च्या पोटकलम (३) अन्वये अपराध्याची सुधारसंस्थेतून मुक्तता करणे आणि अशा अपराध्याला द्यावयाचा लायसनचा नमुना ] ;

[४][(ग) या अधिनियमान्वये, [५][ व्यक्तींना ] सुरक्षागृहात, किंवा, यथास्थिति, सुधारसंस्थेत स्थानबद्ध करणे किंवा ठेवणे आणि त्यांचे परिरक्षण करणे ; ]

---

[१] १९८६ चा अधिनियम ४४, कलम २२ द्वारे समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम २३ द्वारे खंड (ख) ऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[३] १९७८ चा अधिनियम ४६, कलम १८ द्वारे समाविष्ट केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे खंड (ग) ऐवजी दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[५] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(घ) सुटका झालेल्या सिद्धापराध्यांच्या निवासस्थानाच्या किंवा निवासस्थान बदलण्याच्या किंवा तेथे गैरहजर असण्याच्या अधिसूचनेबाबत कलम ११ च्या तरतुदी अंमलात आणणे ;

(ङ) कलम १३ च्या पोटकलम (१) अन्वये विशेष पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी प्राधिकार प्रदान करणे ;

(च) कलम १८ च्या तरतुदी अंमलात आणणे ;

[1][(छ)(एक) कलम २१ अन्वये सुरक्षागृहांची किंवा सुधारसंस्थांची स्थापना, परिरक्षण, व्यवस्थापन आणि पर्यवेक्षण आणि अशा सुरक्षागृहांमध्ये किंवा सुधारसंस्थांमध्ये कामावर असणाऱ्या व्यक्तींची नियुक्ती, त्यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(दोन) लायसन मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना आणि अशा अर्जात अंतर्भूत करावयाचा तपशील ;

(तीन) लायसन देण्याची किंवा तिचे नवीकरण करण्याची कार्यपद्धती, असे लायसन ज्या वेळेस देण्यात किंवा नवीकरण करण्यात येईल ती वेळ आणि लायसनच्या अर्जासंबंधी सर्व आणि संपूर्ण तपासणी करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(चार) लायसनचा नमुना आणि त्यात विनिर्दिष्ट करावयाच्या शर्ती ;

(पाच) ज्या रीतीने सुरक्षागृहाचे आणि सुधारसंस्थेचे लेखे ठेवण्यात येतील व त्यांची लेखापरीक्षा केली जाईल ती रीत ;

(सहा) लायसनधारकाने नोंदवह्या व विवरणपत्रे ठेवणे आणि अशा नोंदवह्यांचा आणि विवरणपत्रांचा नमुना ;

(सात) सुधारगृहांतील आणि सुधारसंस्थांमधील सहवाशांची काळजी, उपचार, परिरक्षा, प्रशिक्षण, निदेशन, नियंत्रण आणि शिस्त ;

(आठ) अशा सहवाशांना भेटी देणे आणि त्यांच्याशी संपर्क साधणे ;

(नऊ) स्थानबद्धतेची शिक्षा झालेल्या, [2][व्यक्तींना], सुरक्षागृहात किंवा सुधारसंस्थेत पाठविण्याची व्यवस्था होईपर्यंत अशा सुरक्षागृहात किंवा सुधारसंस्थेत तात्पुरते स्थानबद्ध करणे ;

(दहा) सहवाशाचे,—

(क) एकाकडून दुसऱ्या सुरक्षागृहाकडे किंवा सुधारसंस्थेकडे ;

(ख) कलम २१ च्या, पोटकलम (९-क) अन्वये एकाकडून दुसऱ्या सुधारसंस्थेकडे किंवा सुरक्षालयाकडे स्थानांतरण करणे ;

(अकरा) जी [2][व्यक्ती] कोडगी असल्याचे किंवा सुरक्षागृहातील किंवा सुधारसंस्थेतील इतर सहवाशांवर तिचा वाईट प्रभाव पडत असल्याचे आढळून येईल, तिला न्यायालयाच्या आदेशानुसार सुरक्षागृहातून किंवा सुधारसंस्थेतून कारागृहात स्थानांतरित करणे आणि अशा कारागृहातील तिच्या स्थानबद्धतेचा कालावधी ;

(बारा) कलम ७ किंवा कलम ८ अन्वये शिक्षा झालेल्या [2][व्यक्तींना] सुरक्षागृहात किंवा सुधारसंस्थेत स्थानांतरीत करणे आणि त्यांच्या अशा सुरक्षागृहातील किंवा संस्थेतील स्थानबद्धतेचा कालावधी ;

(तेरा) सुरक्षागृहातून किंवा सुधारसंस्थेतून एकतर पूर्णपणे किंवा शर्तीच्या अधीनतेने सहवाशांची सुटका करणे आणि अशा शर्तीचा भंग केल्याच्या प्रसंगी त्यांना अटक करणे ;

(चौदा) अल्प कालावधीकरिता सहवाशांला, तो स्वत: अनुपस्थित राहण्याची परवानगी देणे ;

(पंधरा) ज्यात [2][व्यक्तींना] ठेवले जाईल, स्थानबद्ध केले जाईल आणि त्यांची देखभाल केली जाईल अशा सुरक्षागृहांची आणि सुधारसंस्थाची आणि इतर संस्थाची तपासणी करणे ;]

(ज) विहित करावी लागेल, किंवा विहित करता येईल अशी कोणतीही अन्य बाब, यांसाठी तरतूद करता येईल.

(३) पोटकलम (२) च्या खंड (घ) किंवा (छ) अन्वये कोणताही नियम करताना राज्य शासन अशी तरतूद करू शकेल की, त्या नियमांचा भंग केल्यास दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होऊ शकेल.

---

[1] १९७८ चा अधिनियम ४६, कलम १८ द्वारे खंड (छ) ऐवजी दाखल केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[2] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे समाविष्ट केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(४) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर विधानमंडळासमोर ठेवले जातील.

हा अधिनियम इतर विवक्षित अधिनियमांना न्यूनकारी नसणे.

२४. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा अन्वयार्थ सुधार शाळा अधिनियम, १८९७ (१८९७ चा ८) याच्या तरतुदींना किंवा उक्त अधिनियमात फेरबदल करून किंवा अन्यथा अधिनियमित केलेल्या बाल गुन्हेगारांशी संबंधित इतर राज्य अधिनियमांना न्यूनकारी असल्याप्रमाणे लावण्यात येणार नाही.

निरसन व व्यावृत्ती.

२५. (१) या अधिनियमाच्या कलम १ व्यतिरिक्तच्या तरतुदी कोणत्याही राज्यात अंमलात येण्याच्या दिनांकापासून त्या राज्यात, अशा दिनांकाच्या लगतपूर्वी त्या राज्यात अंमलात असलेल्या [१][व्यक्तींच्या] अपव्यापाराचे दमन करण्याशी किंवा वेश्याव्यवसायाला प्रतिबंध करण्याशी संबंधित असलेले सर्व राज्य अधिनियम निरसित झाल्याचे मानण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही राज्य अधिनियमाचे या अधिनियमाद्वारे निरसन झाले असले तरीही, अशा राज्य अधिनियमाच्या तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई (यात कोणताही निर्देश देणे, कोणतीही नोंदवही, नियम किंवा आदेश करणे, कोणताही निर्बंध लादणे याचा समावेश होतो) ही जेथवर या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, अशी कोणतीही गोष्ट किंवा केलेली कारवाई करण्यात आली तेव्हा जणू काही या उक्त अधिनियमाच्या तरतुदी अंमलात होत्या असे मानून या अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा कारवाईमुळे ती निष्प्रभावित होईपर्यंत अंमलात असल्याचे चालू राहील.

**स्पष्टीकरण.**—या कलमात, " राज्य अधिनियम " या शब्दप्रयोगात प्रांतिक अधिनियमाचा समावेश आहे.

## [२][**अनुसूची**]

[कलम २ (ग) पहा]

| कलम | अधिकारांचा वापर करण्यास सक्षम असणारे दंडाधिकारी |
|---|---|
| ७ (१) | जिल्हा दंडाधिकारी. |
| ११ (४) | प्रथम वर्ग महानगर दंडाधिकारी किंवा न्याय दंडाधिकारी. |
| | [३]* * * * * |
| १५ (५) | प्रथम वर्ग महानगर दंडाधिकारी, न्याय दंडाधिकारी, जिल्हा दंडाधिकारी किंवा उप विभागीय दंडाधिकारी. |
| १६ | प्रथम वर्ग महानगर दंडाधिकारी, न्याय दंडाधिकारी, जिल्हा दंडाधिकारी किंवा उप विभागीय दंडाधिकारी. |
| १७ | जिल्हा दंडाधिकारी किंवा उप विभागीय दंडाधिकारी. |
| १९ | प्रथम वर्ग महानगर दंडाधिकारी, न्याय दंडाधिकारी, जिल्हा दंडाधिकारी किंवा उप विभागीय दंडाधिकारी. |
| २० | जिल्हा दंडाधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी किंवा राज्य शासनाने विशेष अधिकार प्रदान केलेला कोणताही कार्यकारी दंडाधिकारी. |
| २२-ख | प्रथम वर्ग महानगर दंडाधिकारी किंवा न्याय दंडाधिकारी. |

[१] १९८६ चा अधिनियम ४४, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[२] १९७८ चा अधिनियम ४६, कलम १९ द्वारे समाविष्ट केले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

[३] १९८६ चा अधिनियम ४४, कलम २४ द्वारे वगळले. (२६ जानेवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

# THE IMMORAL TRAFFIC (PREVENTION) ACT, 1956

## अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६

इंग्रजी—मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abetment | अपप्रेरणा | [Sec. 4 *(2)* *(b)*] |
| absence | गैरहजर | [Sec. 23 *(2)* *(D)*] |
| abuse | दुराचार | [Sec. 2 *(a)*] |
| adequate | पर्याप्त | [Sec. 6 *(1)* *(b)* *(Pro.)*] |
| admonition | समज देणे | [Sec. 10] |
| against the will | इच्छेविरूद्ध | [Sec. 5 *(d)*] |
| annoyance | त्रास | [Sec. 8 *(b)*] |
| appellate court | अपील न्यायालय | [Sec. 11 *(3)*] |
| appropriate | समुचित | [Sec. 2 *(g)*] |
| balcony | सज्जा | [Sec. 8 *(a)*] |
| bond | बंधपत्र | [Sec. 17 *(4)* *(Pro.)*] |
| brothel | कुंटणखाना | [Sec. 2 *(a)*] |
| care | १. देखरेख | [Sec. 9] |
| | २. दक्षता | [Sec. 17 *(4)* *(b)*] |
| charge | प्रभार | [Sec. 9] |
| child | बालक | [Sec. 2 *(aa)*] |
| civil proceeding | दिवाणी कार्यवाही | [Sec. 15 *(6)*] |
| cognizable | दखलपात्र | [Sec. 14] |
| commercial | वाणिज्यिक | [Sec. 2 *(f)*] |
| commissioned | राजादिष्ट | [Sec. 13 *(2a)* *(Pro.)*] |
| competent | सक्षम | [Sec. 2 *(c)*] |
| compliance | अनुपालन | [Sec. 20 *(4)* *(a)*] |
| conducive | घडवून आणण्यासाठी | [Sec. 10a *(1)* *(b)*] |
| control | नियंत्रण | [Sec. 4 *(2)* *(b)*] |
| corrective institutions | सुधार संस्था | [Sec. 2 *(b)*] |
| custody | अभिरक्षा | [Sec. 9] |
| decency | शिष्टाचार | [Sec. 8 *(b)*] |
| derogatory | न्यूनकारी | [Sec. 24] |
| detained | स्थानबद्ध | [Sec. 2 *(b)*] |
| direction | १. निर्देशन | [Sec. 4 *(2)* *(b)*] |
| | २. निदेश | [Sec. 14 *(Pro.)* *(I)*] |
| discretion | विवेकाधिकार | [Sec. 21 *(1)*] |
| earnings | कमाई | [Sec. 4 *(1)*] |
| endeavours to attract | लक्ष वेधून घेणे | [Sec. 8 *(a)*] |
| eviction | निष्कासन | [Sec. 18 *(1)* *(a)*] |
| frequent | वारंवार | [Sec. 20 *(1)*] |
| genuineness | खरेपणा | [Sec. 17*a*] |
| gesture | अंगविक्षेप | [Sec. 8 *(a)*] |
| good conduct | सदाचार | [Sec. 10] |
| habitual company | नित्य संगत | [Sec. 4 *(2)* *(a)*] |
| habitual offender | सराईत गुन्हेगार | [Sec. 12] |
| harbour | आसरा | [Sec. 20 *(4)* *(b)*] |
| harmful influence | हानिकारक प्रभाव | [Sec. 17 *(1)* *(Pro.)* *(II)*] |

| | | |
|---|---|---|
| immoral | अनैतिक | [ title ] |
| improper use | अयोग्य वापर | [ Sec. 18 (*1*) (*a*) (*Pro.*) ] |
| in-charge | प्रभारी | [ Sec. 3 (*2*) (*a*) ] |
| induce | प्रवृत्त | [ Sec. 5 (*3*) (*b*) ] |
| industrious | उद्यमशील | [ Sec. 10 (*a*) (*3*) ] |
| influence | प्रभाव | [ Sec. 4 (*2*) (*b*) ] |
| inhabitant | रहिवासी | [ Sec. 15 (*2*) ] |
| injury | जखम | [ Sec. 15 (*5a*) ] |
| inmate | सहवासी | [ Sec. 23 (*2*) (*g*) (VII) ] |
| inoperative | अप्रवर्ती | [ Sec. 3 (*3*) ] |
| investigation | अन्वेषण | [ Sec. 17 *a* ] |
| jurisdiction | अधिकारिता | [ Sec. 20 (*1*) ] |
| knowingly | बुद्धिपुरस्सर | [ Sec. 3 (*2*) (*a*) ] |
| landlord | जमीनमालक | [ Sec. 3 (*2*) (*b*) ] |
| lessee | पट्टेदार | [ Sec. 3 (*2*) (*a*) ] |
| lessor | पट्टाकार | [ Sec. 3 (*2*) (*b*) ] |
| licence | अनुज्ञप्ती | [ Sec. 2 (*g*) ] |
| living | उपजीविका | [ Sec. 4 (*1*) ] |
| loiter | भटकणे | [ Sec. 8 (*b*) ] |
| magistrate | दंडाधिकारी | [ Sec. 2 (*c*) ] |
| maintenance | परिरक्षण | [ Sec. 23 (*2*) (*b*) ] |
| major | सज्ञान | [ Sec. 2 (*ca*) ] |
| medical practitioner | वैद्यक व्यावसायी | [ Sec. 15 (*5a*) ] |
| Metropolitan Magistrate | महानगर दंडाधिकारी | [ Sec. 22 ] |
| minor | १. अज्ञान | [ Sec. 2 (*cb*) ] |
| | २. अज्ञानी व्यक्ती | [ Sec. 17 (*3*) ] |
| nursing home | शुश्रुषालय | [ Sec. 7 (*1*) (*b*) ] |
| occupation | भोगवटा | [ Sec. 3 (*3*) ] |
| occupier | वहिवाटदार | [ Sec. 3 (*2*) (*a*) ] |
| parents | मातापिता | [ Sec. 17*a* ] |
| pimp | मध्यस्थ | [ Sec. 4 (*2*) (*c*) ] |
| place of worship | पूजास्थान | [ Sec. 7 (*1*) (*b*) ] |
| pledge | तारण | [ Sec. 6 (*4*) ] |
| practicable | व्यवहार्य | [ Sec. 21 (*3*) (*Pro.*) ] |
| presiding officer | पीठासीन अधिकारी | [ Sec. 22*a* ] |
| presume | गृहीत | [ Sec. 4 (*2*) (*c*) ] |
| prevention | प्रतिबंध | [ title ] |
| probation | परिवीक्षा | [ Sec. 10*a* (*1*) (*Pro.*) (*I*) ] |
| prospect | शक्याशक्यता | [ Sec. 17 (*2*) ] |
| prostitution | वेश्याव्यवसाय | [ Sec. 2 (*f*) ] |
| protective home | १. सुरक्षागृह | [ Sec. 2 (*g*) ] |
| | २. सुरक्षालय | [ Sec. 23 (*2*) (g) (X) (b) ] |
| psychiatric treatment | मानसोपचार | [ Sec. 17 (*4*) (*Pro.*) ] |
| purpose | प्रयोजन | [ Sec. 2 (*f*) ] |
| qualification | अर्हता | [ Sec. 2 (*g*) ] |

| | | |
|---|---|---|
| reformatory school | सुधार शाळा | [ Sec. 24 ] |
| remaining provisions | उर्वरित तरतुदी | [ Sec. 1 (*3*) ] |
| removal | सुटका | [ Sec. 17 (*1*) ] |
| report | प्रतिवृत्त | [ Sec. 2*a* (*a*) ] |
| requiring | फर्मावणे | [ Sec. 20 (*1*) ] |
| respectable | प्रतिष्ठित | [ Sec. 15 (*2*) ] |
| result | निष्कर्ष | [ Sec. 21 (*4*) ] |
| retained | अडकवणे | [ Sec. 6 (*4*) ] |
| revision | पुनर्विलोकन | [ Sec. 10*a* (*2*) ] |
| rigorous imprisonment | सश्रम कारावास | [ Sec. 3 (*1*) ] |
| safe custody | सुरक्षित अभिरक्षा | [ Sec. 17 (*1*) ] |
| search | झडती | [ Sec. 2*a* (*a*) ] |
| seduce | फितवणे | [ Sec. 8 (*M. N.*) ] |
| set aside | रद्द होणे | [ Sec. 11 (*2*) ] |
| sexual exploitation | लैंगिक शोषण | [ Sec. 2 (*a*) ] |
| shelter | आश्रयस्थान | [ Sec. 2 (*b*) ] |
| social welfare | समाज कल्याण | [ Sec. 17 (*5*) ] |
| solicit | अभियाचना | [ Sec. 8 (*b*) ] |
| subject to appeal | अपिलाधीन | [ Sec. 18 (*3*) ] |
| subsequent | उत्तरवर्ती | [ Sec. 8 (*b*) ] |
| summary | संक्षिप्त | [ Sec. 22b (*Pro.*) ] |
| supervision | देखरेख | [ Sec. 10*a* (*4*) ] |
| technical | तांत्रिक | [ Sec. 2 (*g*) ] |
| tenant | भाडेकरू | [ Sec. 3 (*2*) (*a*) ] |
| to canceal | लपविणे | [ Sec. 20 (*4*) (*b*) ] |
| to follow | अनुसरणे | [ Sec. 23 (*2*) (*g*) (*III*) ] |
| to issue | जारी करणे | [ Sec. 15 (*2*) ] |
| to life | आजीव | [ Sec. 5 (*Pro.*) (*a*) ] |
| to molest | छेड काढणे | [ Sec. 8 (*b*) ] |
| to rehear | फेरसुनावणी करणे | [ Sec. 22b (*Pro.*) ] |
| to solicit | मोह घालणे | [ Sec. 8 (*M. N.*) ] |
| tout | दलाल | [ Sec. 4 (*2*) (*c*) ] |
| traffic | व्यापार | [ title ] |
| trafficking | अपव्यापार | [ Sec. 2 (*j*) ] |
| transferable | हस्तांतरणीय | [ Sec. 21 (*6*) ] |
| transferred | स्थानांतरण | [ Sec. 21 (*9a*) ] |
| truth | सत्यता | [ Sec. 20 (*3*) ] |
| undue delay | अवाजवी विलंब | [ Sec. 15 (*1*) ] |
| useful | उपयुक्त | [ Sec. 10a (*3*) ] |
| void | शून्य ठरणे | [ Sec. 11 (*2*) ] |
| wearing apparel | वस्त्रप्रावरण | [ Sec. 6 (*3*) (*a*) ] |
| wilful exposure | बुद्धिपुरस्सर प्रदर्शन | [ Sec. 8 (*a*) ] |
| witness | साक्षीदार | [ Sec. 22*b* ] |

## अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६

# THE IMMORAL TRAFFIC (PREVENTION) ACT, 1956

### मराठी—इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अडकवणे | retained | [ कलम ६ (४) ] |
| अज्ञान | minor | [ कलम २(गख) ] |
| अज्ञानी व्यक्ती | minor | [ कलम १७ (३) (परंतुक) ] |
| अधिकारिता | jurisdiction | [ कलम २० (१) ] |
| अनुज्ञप्ती | licence | [ कलम २ (छ) ] |
| अनुपालन | compliance | [ कलम २० (४) (क) ] |
| अनुसरणे | to follow | [ कलम २३ (२) (छ) (तीन) ] |
| अनैतिक | immoral | [ शीर्षक ] |
| अन्वेषण | investigation | [ कलम १७क. ] |
| अपप्रेरणा | abetment | [ कलम ४ (२) (ख) ] |
| अपव्यापार | trafficking | [ कलम २ (ञ) ] |
| अपिलाधीन | subject to appeal | [ कलम १८ (३) ] |
| अपील न्यायालय | appellate court | [ कलम ११ (३)] |
| अप्रवर्ती | inoperative | [ कलम ३ (३) ] |
| अभियाचना | solicit | [ कलम ८ (ख) ] |
| अभिरक्षा | custody | [ कलम ९ ] |
| अयोग्य वापर | improper use | [ कलम १८ (१) (क) (परंतुक) ] |
| अर्हता | qualification | [ कलम २ (छ) ] |
| अवाजवी विलंब | undue delay | [ कलम १५ (१) ] |
| आजीव | to life | [ कलम ५ (परंतुक) (क) ] |
| आश्रयस्थान | shelter | [ कलम २ (ख) ] |
| आसरा | harbour | [ कलम २० (४) (ख) ] |
| अंगविक्षेप | gesture | [ कलम ८(क) ] |
| इच्छेविरूद्ध | against the will | [ कलम ५ (घ) ] |
| उत्तरवर्ती | subsequent | [ कलम ८ (ख) ] |
| उद्यमशील | industrious | [ कलम १०क (३) ] |
| उपजीविका | living | [ कलम ४ (१) ] |
| उपयुक्त | useful | [ कलम १० क (३) ] |
| उर्वरित तरतुदी | remaining provisions | [ कलम १ (३) ] |
| कमाई | earnings | [ कलम ४ (१) ] |
| कुंटणखाना | brothel | [ कलम २ (क) ] |
| खरेपणा | genuineness | [ कलम १७ क ] |
| गैरहजर | absence | [ कलम २३ (२) (घ) ] |
| गृहीत | presume | [ कलम ४ (२) (ग) ] |
| घडवून आणण्यासाठी | conducive | [ कलम १० क (१) (ख) ] |
| छेड काढणे | to molest | [ कलम ८ (ख) ] |
| जखम | injury | [ कलम १५ (५क )] |
| जमीनमालक | landlord | [ कलम ३ (२) (ख) ] |
| जारी करणे | to issue | [ कलम १५ (२) ] |
| झडती | search | [ कलम २क (क) ] |
| तारण | pledge | [ कलम ६ (४) ] |
| तांत्रिक | technical | [ कलम २ (छ)] |
| त्रास | annoyance | [ कलम ८ (ख) ] |

| | | |
|---|---|---|
| दक्षता | care | [ कलम १७ (४) (ख)] |
| दखलपात्र | cognizable | [ कलम १४ ] |
| दलाल | tout | [ कलम ४ (२) (ग) ] |
| दिवाणी कार्यवाही | civil proceeding | [ कलम १५ (६) ] |
| दुराचार | abuse | [ कलम २ (क) ] |
| देखरेख | 1. care, | [ कलम ९ ] |
| | 2. supervision | [ कलम १० क (४) ] |
| दंडाधिकारी | magistrate | [ कलम २ (ग) ] |
| नित्य संगत | habitual company | [ कलम ४ (२) (क) ] |
| निदेश | direction | [ कलम १४ (परंतुक) (एक) ] |
| नियंत्रण | control | [ कलम ४ (२) (ख) ] |
| निर्देशन | direction | [ कलम ४ (२) (ख) ] |
| निष्कर्ष | result | [ कलम २१ (४) ] |
| निष्कासन | eviction | [ कलम १८ (१) (क) ] |
| न्यूनकारी | derogatory | [ कलम २४ ] |
| पट्टाकार | lessor | [ कलम ३ (२) (ख) ] |
| पट्टेदार | lessee | [ कलम ३ (२) (क) ] |
| परिरक्षण | maintenance | [ कलम २३ (२) (ख) ] |
| परिवीक्षा | probation | [ कलम १०क (१) (परंतुक) (एक) ] |
| पर्याप्त | adequate | [ कलम ६ (१) (ख) परंतुक ] |
| पीठासीन अधिकारी | presiding officer | [ कलम २२ क ] |
| पुनर्विलोकन | revision | [ कलम १० क (२) ] |
| पूजास्थान | place of worship | [ कलम ७ (१) (ख) ] |
| प्रतिबंध | prevention | [ शीर्षक ] |
| प्रतिवृत्त | report | [ कलम २ क (क) ] |
| प्रतिष्ठित | respectable | [ कलम १५ (२) ] |
| प्रभार | charge | [ कलम ९ ] |
| प्रभारी | in-charge | [ कलम ३ (२) (क) ] |
| प्रभाव | influence | [ कलम ४ (२) (ख) ] |
| प्रयोजन | purpose | [ कलम २ (च) ] |
| प्रवृत्त | induce | [ कलम ५ (३) (ख) ] |
| फर्मावणे | requiring | [ कलम २० (१) ] |
| फितवणे | seduce | [ कलम ८ (स. टी.) ] |
| फेरसुनावणी करणे | to rehear | [ कलम २२ (ख) (परंतुक) ] |
| बालक | child | [ कलम २ (कक) ] |
| बुद्धिपुरस्सर | knowingly | [ कलम ३ (२) (क) ] |
| बुद्धिपुस्सर प्रदर्शन | wilful exposure | [ कलम ८ (क) ] |
| बंधपत्र | bond | [ कलम १७ (४) (परंतुक) ] |
| भटकणे | loiter | [ कलम ८ (ख) ] |
| भाडेकरू | tenant | [ कलम ३ (२) (क) ] |
| भोगवटा | occupation | [ कलम ३ (३) ] |
| मध्यस्थ | pimp | [ कलम ४ (२) (ग) ] |
| महानगर दंडाधिकारी | Metropolitan Magistrate | [ कलम २२ ] |
| मातापिता | parents | [ कलम १७ क ] |
| मानसोपचार | psychiatric treatment | [ कलम १७ (४) (परंतुक) ] |
| मोह घालणे | to solicit | [ कलम ८ (स. टी.) ] |

| | | |
|---|---|---|
| रद्द होणे | set aside | [ कलम ११ (२) ] |
| रहिवासी | in habitant | [ कलम १५ (२) ] |
| राजादिष्ट | commissioned | [ कलम १३ (२क) (परंतुक) (ख) ] |
| लक्ष वेधून घेणे | endeavours to attrack | [ कलम ८ (क) ] |
| लपविणे | to conceal | [ कलम २० (४) (ख) ] |
| लैंगिक शोषण | sexual exploitation | [ कलम २ (क) ] |
| वस्त्रप्रावरण | wearing apparel | [ कलम ६ (३) (क) ] |
| वहिवाटदार | occupier | [ कलम ३ (२) (क) ] |
| वाणिज्यिक | commercial | [ कलम २ (च) ] |
| वारंवार | frequent | [ कलम २० (१) ] |
| विवेकाधिकार | discretion | [ कलम २१ (१) ] |
| वेश्याव्यवसाय | prostitution | [ कलम २ (च) ] |
| वैद्यक व्यावसायी | medical practitioner | [ कलम १५ (५क) ] |
| व्यवहार्य | practicable | [ कलम २१ (३) (परंतुक) ] |
| व्यापार | traffic | [ शीर्षक ] |
| शक्यशक्यता | prospect | [ कलम १७ (२) ] |
| शिष्टाचार | decency | [ कलम ८ (ख) ] |
| शुश्रूषालय | nursing home | [ कलम ७ (१) (ख) ] |
| शून्य ठरणे | void | [ कलम ११ (२) ] |
| सक्षम | competent | [ कलम २ (ग) ] |
| सज्जा | balcony | [ कलम ८ (क) ] |
| सत्यता | truth | [ कलम २० (३) ] |
| सदाचार | good conduct | [ कलम १० ] |
| सज्ञान | major | [ कलम २ (गक) ] |
| समज देणे | admonition | [ कलम १० ] |
| समाजकल्याण | social welfare | [ कलम १७ (५) ] |
| समुचित | appropriate | [ कलम २ (छ) ] |
| सराईत गुन्हेगार | habitual offender | [ कलम १२ ] |
| सश्रम कारावास | rigorous imprisonment | [ कलम ३ (१) ] |
| सहवासी | immate | [ कलम २३ (२) (छ) (सात) ] |
| साक्षीदार | witness | [ कलम २२ ख ] |
| सुटका | removal | [ कलम १७ (१) ] |
| सुधार शाळा | reformatory school | [ कलम २४ ] |
| सुधार संस्था | corrective institutions | [ कलम २ (ख) ] |
| सुरक्षागृह | protective home | [ कलम २ (छ) ] |
| सुरक्षालय | protective home | [ कलम २३ (३) (छ) (दहा) (ख) ] |
| सुरक्षित अभिरक्षा | safe custody | [ कलम १७ (१) ] |
| संक्षिप्त | summary | [ कलम १२ ख (परंतुक) ] |
| स्थानबद्ध | detained | [ कलम २ (ख) ] |
| स्थानबद्धता | detention | [ कलम १०क (१) (ख) ] |
| स्थानांतरण | transferred | [ कलम २१ (९क) ] |
| हस्तांतरणीय | transferable | [ कलम २१ (६) ] |
| हानिकारक प्रभाव | harmful influence | [ कलम १७ (१) (परंतुक) (दोन) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई